www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 306 रविवार दि. 20 जुलै २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

मुंबई : मराठा आरक्षण कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर उच्च न्यायालयात अंतिम सुनावणीस शुक्रवारपासून सुरुवात झाली. पुन्हा एकदा कायद्याला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली. मात्र, न्यायालयाने यापूर्वीच आपण आवश्यक आदेश दिल्याने आता थेट अंतिम सुनावणीस सुरुवात करत आहोत, असे स्पष्ट केले.

**हे आहे विशेष खंडपीठ :**
न्या. रवींद्र घुगे, न्या. एन. जे. जमादार व न्या. संदीप मारणे यांच्या विशेष खंडपीठापुढे या याचिकांवर सुनावणी सुरू झाली.

राज्य सरकारने एसईबीसी कायद्यांतर्गत दिलेल्या १० टक्के मराठा आरक्षणाविरोधात उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल आहेत.

**शुक्रे समितीचा अहवाल योग्य नाही, असे वाटते का?**
मराठा समाजाच्या मागासलेपणाची पडताळणी करताना मराठा समाजाची तुलना खुल्या प्रवर्गाशी करण्यात आली. ही तुलना अन्य प्रवर्गाशी करणे गरजेचे आहे. मात्र, शुक्रे आयोगाने तसे केले नाही, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. याचा अर्थ अहवाल योग्य नाही, असे तुम्हाला म्हणायचे आहे का? असे न्यायालयाने विचारल्यावर वकिलांनी या अहवालाला आव्हान दिल्याचे म्हटले. याचा अर्थ शुक्रे समितीचा अहवाल योग्य नाही, असे तुम्हाला वाटते का, असे प्रश्न विशेष खंडपीठाने केले.

या कायद्यामुळे मराठा समाजाला शैक्षणिक संस्था व सरकारी नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण मिळणार आहे. मात्र, या आरक्षणामुळे कमाल आरक्षणाची म्हणजे ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यात येत असल्याचा दावा याचिकादारांनी केला आहे. उच्च न्यायालयाने याचिकेवरील पुढील सुनावणी शनिवारी ठेवली आहे.

## नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाचे लोकार्पण



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भिंगारी येथे असलेल्या पनवेल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाचा लोकार्पण सोहळा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. महायुती सरकारच्या माध्यमातून राज्यभरात विविध विकास कामांना चालना दिली जात आहे. यामध्येच पनवेल विधानसभा क्षेत्रात आज करोडो रुपयांची कामांच्या उद्घाटन मला करताना आनंद होत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने ही कामे मुदतीच्या वेळेआधीच केल्याने मी अधिकाऱ्यांचे कौतुक करतो असे प्रतिपादन यावेळी सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी व्यक्त केले. पनवेलकरांच्या दृष्टिकोनातून आज महत्त्वाचा दिवस आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या उपस्थितीत आज कोट्यावधी रुपयांच्या विकास कामांची उद्घाटन पनवेल विधानसभा मतदारसंघात होत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा शिवेंद्रराजे भोसले पुढे नेत आहेत त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात विविध विकास कामांना चालना मिळाली आहे, असे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी उद्घाटनाप्रसंगी व्यक्त केले. पान २ वर

## स्पर्धा गोष्टींची' स्पर्धेची अंतिम फेरी संपन्न

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची लाभली प्रमुख उपस्थिती



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'स्पर्धा गोष्टींची' या स्पर्धेची अंतिम फेरी आज मोठ्या उत्साहात पार पडली. सदर स्पर्धेत एकुण १०९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शहरातील गोखले सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून माजी सभागृह नेते परेशशेठ ठाकूर, भाजपा जिल्हा नेते श्रीनंद पटवर्धन, पनवेल मंडल अध्यक्ष सुमित झुंजारराव, महिला मोर्चा अध्यक्षा रुचिता लोंढे, पनवेल मंडल सरचिटणीस अमित ओझे, प्रितम म्हात्रे, पवन सोनी, मंगेश अपराज, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, चिन्मय समेळ, रोहित जगताप, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, वैभव बुवा आदि मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धेचे आयोजन युवा मोर्चाचे अनिमेष ओझे, रुद्र पाटील, अभि रिंगे, शिवराज बोबडे, प्रथम दासरी, आशुतोष पाटील, प्रथम ठाकरे, कोमल कोळी, अनिमेष पटवर्धन, आकाश गाडे, हिमांशु पाटील, निखिल जोगळेकर, हर्षल बहाडकर यांच्यावतीने करण्यात आले होते. इयत्ता पाचवी ते दहावी अशा गटात झालेल्या या स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्याला प्रत्येकी ३ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १ हजार रुपये तर उत्तेजनार्थ पारितोषिकास पाचशे रुपये आणि सर्व बक्षीस पात्र विजेत्यांना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र असे बक्षिसांचे स्वरूप होते. संतांची कथा, बोधकथा, अकबर बिरबल कथा व इसापनीतीच्या कथा या विषयावर हि स्पर्धा झाली. विविध गटात झालेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक अथश्री जोशी, तारुण्य बीडवी, महेंद्र पोहराम, आर्या कडू, हिमांशू परमार, द्वितीय क्रमांक ध्रुव जाधव, अमर विश्वकर्मा, स्वरा भिसे, प्रिन्स वाकोडे, अधिशेष घुगरे, तृतीय क्रमांक चिन्मयी भिडे, पारस लुहार, आशियान अन्सारी, सोनाक्षी दालवाले, गौरी शिंदे तर उतेजनार्थ पारितोषिक मयुरी काकोडिया, आर्यन प्रजापती, अबीर बावळे, राज सरोज आणि कनिष्का सुराते यांनी पटकावला. परीक्षक म्हणून प्रिती धोपाटे यांनी काम पहिले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर कणखर नेतृत्व- मंत्री शिवेंद्रराजे भोसले





**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासारखे कणखर नेतृत्व लाभल्यामुळे या तालुका आणि जिल्ह्याचा विकास रोखणे अशक्य आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी काढले. ते चिपळे येथील नव्या पुलाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या चिपळे येथील पुलाचे लोकार्पण राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत (दि. १९ जुलै) झाले. या पुलामुळे आजूबाजूच्या गावांची कनेक्टिव्हीटी सुरळीत झाली आहे. पनवेल तालुका आणि जिल्हा हे आज झपाट्याने प्रगतिपथावर वाटचाल करत आहेत. या प्रगतीमागे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे खंबीर नेतृत्व, दूरदृष्टी आणि जनविकासाभिमुख दृष्टीकोन असल्याचे नामदार शिवेंद्रराजे भोसले यांनी यावेळी बोलताना अधोरेखित केले. या सोहळ्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, प्रल्हाद केणी, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, पान २ वर















## लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर कणखर नेतृत्व- मंत्री शिवेंद्रराजे भोसले

पान १ वरुन
भाजपचे पनवेल तालुका पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, एकनाथ देशेकर, माजी सरपंच रमेश पाटील, शिवाजी दुर्गे, वासुदेव गवते, विभागीय अध्यक्ष सुनिल पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, डॉ. रोशन पाटील, विश्वजित पाटील, मयूर कदम, गौरव कांडपिळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. सन १९७५ साली बांधण्यात आलेल्या नेरे मालडुंगे रस्त्यावरील चिपळे पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते. या पुलाचे आयुर्मान जवळपास ५० वर्षे होते. मात्र २००५ मध्ये आलेल्या पुराचा मोठा तडाखा या पुलाला बसला आणि पुलाचे नुकसान झाले होते. पूल खचण्याची भीती निर्माण झाली होती, त्यामुळे या पुलाची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांडून होत होती. भविष्यात मोठा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती, पूल धोकादायक झाल्याने तात्पुरती डागडुजी उपयोगाची नसल्याने यावर योग्य पर्याय म्हणून त्या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यातून नवीन पुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाने अर्थसंकल्पीय निधीतून १० कोटी रुपये खर्च करून या पुलाची उभारणी झाली. या पुलाच्या माध्यमातून नेरे, चिपळे, वाजे, गाढेश्वर, धोदाणी, मालडुंगे या परिसरात जाण्यासाठी उपयोग केला जातो. हा पूल जवळपास ६६ मिटर लांब, १२ मीटर रुंद आहे. वाहतुकीच्या दृष्टिकोनातून या पुलाच्या सुविधेमुळे प्रवाशी, वाहनचालक आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला असून या विकासकामासाठी सतत प्रयत्न केल्याबद्दल नागरिकांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, एस. एस. गांगुर्डे, कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, उप विभाग अधिकारी मिलिंद चव्हाण, सहाय्यक अभियंता प्रज्ञा पाटील आदी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाचे लोकार्पण

पान १ वरुन
शासकीय विभाग असला तरी या शासकीय इमारतीला कॉर्पोरेट कार्यालयाचा लुक सार्वजनिक बांधकाम खात्याने दिला आहे त्यामुळे आता शासकीय कार्यालय आपली कुस बदलत आहेत असं मत या उद्घाटनाप्रसंगी विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील यांनी व्यक्त केले.

या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विभागीय अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक अमोघ ठाकूर, भार्गव ठाकूर,पी.पी खारपाटील, मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, दिनेश खानावकर, सुमित झुंजारराव, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आमित जाधव, विचुंबे ग्रामपंचायत सरपंच प्रमोद भिंगारकर,अनेश ढवळे, योगेश लहाने, यांच्यासह अधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसुली थांबवा नसता टोल प्लाझाची तोडफोड - महेश नळगे.

**दैनिक युवक आधार**
**राजू शिंदे**

शेगाव ते पंढरपूर हा ४३० किलोमीटरचा दोन हजार कोटी रुपये खर्चुन रस्ता अजून पूर्ण झालेला नाही तो सात वर्षांपासून अजूनही तयार करण्याचेच काम सुरु आहे. मंठा व परतूर मतदारसंघाचे भाग्य बदलणाऱ्या य रस्त्याच्या कामास सुरुवात होऊन तब्बल ८-९ वर्ष झाले मात्र अजूनही परतूर तालुक्यात अनेक ठिकाणी रस्त्याच्या मधोमध या सिमेंट रस्त्याला भेगा पडलेल्या आहेत. काही ठिकाणी थातूर-मातूर ठिगळं दिलेले आहेत. मात्र, याचा वाहनचालकांना त्रास होतोय. त्याचबरोबर अनेक ठिकाणी पुलाची कामं रखडलेली आहेत. तरीही लोणी टोल



नाक्यावर कुणाच्या आशीर्वादाने टोलवसुली सुरु झाली आहे, याची माहिती कुणीही देण्यास तयार नाही यामुळे जड वाहनचालक खूप त्रासलेले आहेत. हा मार्ग पूर्ण झाल्यावर परतूर मंठा परिसराचा विकास होण्याबरोबरच बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील. या आशेने २०१८ ला परतूरचे आमदार व तत्कालीन पालकमंत्री लोणीकर यांनी 'राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत दिंडी मार्ग म्हणून खामगाव लोणार-मंठा-परतूर-माजलगाव कळंब बार्शी-पंढरपूर-सांगोला या ४३० किलोमीटरच्या रस्त्याचे काम वेगाने करण्यासाठी खूप परिश्रम घेतले होते व ते आजही सुरु आहेत. मात्र, परतूरहून माजलगावला जाताना श्रीष्टी, लोणी, लंकडदरा, सावंगी गंगा किनारा, सादोळामार्गे माजलगावला जावे लागते. यामार्गावरील श्रीष्टी, लंकडदरा, सावंगी गंगा किनारा व सादोळा आदी ठिकाणच्या पुलाचे व रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. तरीही लोणी टोल प्लाझावर वसुली कशी व कोणाच्या आदेशाने सुरु झाली हे कळायला मार्ग नाही.

**टोलनाका दिवसा बंद, रात्री सुरु..**

मंठ्यावरून लोणारला जाताना तळणीजवळील टोल व लोणी येथील टोल प्लाझावर कधी कधी दिवसा टोल घेणे बंद असते. मात्र, रात्री जड वाहन चालकांकडून टोल वसूल केला जात असल्याच्या तक्रारी वाहनचालक करत आहेत. संबंधितांनी जोपर्यंत पूर्ण रस्त्याचे व पुलाचे काम पूर्ण होत नाहीत तोपर्यंत टोल वसूल करू नये. याची शासन व कंपनीने वेळीच दखल घेवून या टोलचा झोल बंद करावा नसता याचे परिणाम सदरील दोन्ही टोलची तोडफोड करण्यात येईल, याला सर्वस्वी जबाबदारी कंपनीची असेल, असा इशारा उबाठाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी दिला आहे.

## तळा येथे मंत्री आदिती ताई तटकरे यांचा जनता संवाद.

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**

: तळा तहसील कार्यालयातील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहामध्ये महिला व बालकल्याण मंत्री अदिती ताई तटकरे यांचा शनिवारी जनता संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या जनता संवाद कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मंत्री महोदयांसमोर तालुक्यातील अनेक विविध विभागाचे प्रश्न मांडले. त्यामध्ये प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेच्या संदर्भात वाळूचा प्रश्न, आरोग्य उपकेंद्र बांधकाम, वीज, रस्ते, तालुक्यातील प्रलंबित जलजीवन पाणी प्रश्न, गुरांच्या चोरीचा प्रश्न यांसारख्या अनेक विषयांवर सविस्तर चर्चा करून प्रश्न तात्काळ सोडवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देऊन अहवाल सादर करण्याची तंबी देखील देण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी माणगाव प्रांत अधिकारी श्री. शिवाजी सानप सर, तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील, तळा नगरपंचायत मुख्याधिकारी, तळा गटविकास अधिकारी श्री. शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सतीश गवई, तसेच संबंधित विभागाचे अनेक अधिकारी - कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# प्रेरणेचा दीप – जमील सर

(सेवानिवृत्त मुख्याध्यापक जमील सरांना समर्पित)

मुख्याध्यापक नव्हते फक्त, शाळेचे होते शिल्पकार,
शिस्त, ज्ञान, आणि माणुसकीचे ठेवेदार।
जिथे प्रत्येक शाळेचं पान बनायचं वंदनीय,
तेथे जमील सरांचं नाव होतं तेजस्वी आणि वंदनीय।
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**
गणित विषयाचे होते गुरू, तेजस्वी, प्रभावी, निपुण,
संकल्पनांना दिला साकार, अर्थाचा आकार,
गणिताला दिलं सौंदर्य, विद्यार्थ्यांच्या मनात दिला आधार।
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**



विद्यार्थ्यांना शिकवताना नुसतं ज्ञान नव्हे,
तर मूल्यं, संस्कार, आणि आत्मविश्वास सुद्धा भरवले।
दगडाला घडवून बनवलं हिरा,
मनाच्या अंधारात लावला उजेडाचा तारा।
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**
फेमच्या माध्यमातून शिक्षण आणि शिक्षकांसाठी केलं उत्तुंग कार्य,
जबाबदारीने प्रत्येक भूमिका निभावली निष्ठेच्या वारंवार।
शिक्षण क्षेत्रात उभं राहिलं त्यांचं एक सशक्त वलय,
सत्य, सेवाभाव आणि प्रामाणिकपणाने सजलेलं त्यांचं प्रत्येक वळण।
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**
केवळ शिक्षक नव्हे, तर समाजभानाने सजलेले,
शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यात झिजणारे, तेजाळलेले।
प्रत्येक, व्यासपीठांवर, ठसा उमटवणारे,
प्रत्येक ठिकाणी आदर्श उभारणारे।
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**
सेवानिवृत्ती म्हणजे थांबणं नाही,
तर नव्या मार्गावर चालण्याची सुरुवात आहे काही।
शाळा आज मुकते एका तेजस्वी सूर्याला,
पण त्यांचे विचार राहतील आमच्या वाटचालेला।
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**
तुमचं आयुष्य म्हणजे आदर्शाचं प्रतीक,
कर्तृत्वाचं जणू अढळ नांदणारं संगीत।
शब्द अपुरे, पण भावना अथांग,
हृदयात कोरलेली तुमची अमर छायाचित्रे अथांग.
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**
संध्याकाळचा सूर्य असतो जरी मावळता,
तरी त्याच्या आठवणी असतात सोन्यासारख्या उजळता।
पुढचं आयुष्य असो आनंदाने सजलेलं,
आरामात, प्रेमात आणि समाधानात भरलेलं।
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**
**शुभेच्छा**
पुढील आयुष्याच्या प्रवासासाठी असो आरोग्य, समाधान आणि नवचैतन्य,
जगाला अजूनही खूप काही द्यायचं आहे तुम्हाला,
सेवा संपली नाही, तीच सुरु झाली एका नव्या रूपाने आता!
**प्रेरणेचा दीप – जमील सर।**
सेवा संपली, पण संपला नाही प्रकाश,
आता स्वतःसाठी जगण्याचा असो नवा अभ्यास।
हरवलेले छंद पुन्हा मिळो नव्याने,
शुभेच्छा तुमच्या जीवनप्रवासाच्या प्रत्येक वळणाने।

**लेखक:-**
**समीर पठाण सर**
**(मुख्याध्यापक सरोश मराठी प्राथमिक शाळा औरंगाबाद)**

# मधुबन कट्ट्यावर फुलल्या रानभाज्यांच्या कविता

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण तर्फे दर महिन्याच्या १७ तारखेला मधुबन कट्टा विमला तलाव येथे कवी संमेलन संपन्न होत असते. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक हिराचंद म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या मधुबन कट्ट्याच्या ११७ व्या कवी संमेलनात कवि मच्छिंद्र म्हात्रे , अजय शिवकर, हेमंत पाटील, बालकवी अनुज शिवकर, अनामिका राम, समता ठाकूर, तेजस्विनी गायकवाड, रायगड भूषण प्राध्यापक एल. बी पाटील, रामचंद्र म्हात्रे,आदी कवींनी रानभाज्यांवर कविता सादर करून काव्य संमेलनाला एक वेगळीच रंगत आली. कवी संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात १७ जुलैचे अवचित्य साधून मधुबन कट्ट्यावर कादंबरीकार श्री गज आनन म्हात्रे यांनी ७७ वर्षांपूर्वी चक्रीवादळाच्या तडाख्याने बुडालेल्या रामदास बोटीच्या आठवणी जाग्या केल्या. यावेळी जेष्ठ पत्रकार जगदीश तांडेल यांनी भविष्यात रानभाज्यांचे संवर्धन करण्यासाठी उरण तालुक्यातील डोंगर, माळराने वाचवायला हवी ,यासाठी खूप मोठ्या



प्रमाणात जनजागृतीची गरज आहे ,असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात श्री मच्छिंद्र म्हात्रे यांनी महाराष्ट्रातील रानभाज्यांचा आढावा व महत्त्व विषद केले, त्याचप्रमाणे कोकण मराठी साहित्य परिषद उरण शाखेतर्फे आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पंढरपूर येथील साहित्यिक वारीचे अनुभव विषद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संजीव पाटील सर यांनी केले तर या कवी संमेलनास ज्येष्ठ नागरिक सूर्यकांत दांडेकर ,चंद्रकांत मुकादम, मारुती तांबे, सौ अनिता शिवकर ,मीना बिष्ट रमेश माळी, रवींद्र सूर्यवंशी, महिंद्र सोनवणे ,देविदास पाटील, सुनील पाटील ,अरविंद घरत ,सुरेश ठाकूर, एस ए चव्हाण ,भीमा अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. रायगड भूषण प्राध्यापक एल. बी. पाटील यांनी आगरी पसायदान सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

## विद्यार्थ्यांनी करिअरच्या उद्देशासोबत प्रामाणिक राहिल्यास यश निश्चित मिळते-सहाय्यक पोलीस प्रविण जाधव



**दैनिक युवक**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये करियर कट्टा संसदेचे उद्घाटन झाले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे हे होते तर प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून शिरूर कासार पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव हे होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय तुपे, करिअर कट्टा समन्वयक डॉ.संजय सावते, प्रा.उत्तम महाले यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना मा.प्रवीण जाधव यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टिकोनातून उत्कृष्ट मार्गदर्शन केले त्या मार्गदर्शनामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय कसे उच्च असावे आणि ते ध्येय गाठत असताना आपण जिद्द चिकाटी मेहनत अथक परिश्रम जर सातत्यपूर्ण केले तर यश निश्चितच आपल्याला मिळेल. असेही ते यावेळी म्हणाले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे म्हणाले की, विद्यार्थ्यांचे आयुष्यामध्ये ध्येय निश्चित असले पाहिजे आपले ध्येय पूर्ण करत असताना करिअर कट्ट्याच्या माध्यमातून राबविण्यात येणारे विविध उपक्रम विद्यार्थ्यांनी अमलात आणले पाहिजेत जर त्यांनी त्या उपक्रमाचा फायदा घेतला तर आपले ध्येय गाठण्यासाठी अधिकचा कालावधी लागणार नाही हे निश्चित आहे. युवकांच्या करिअरला नवीन आयाम देण्याचे काम महाविद्यालयीन जीवनामध्ये करिअर कट्टा करतो असेही याप्रसंगी ते म्हणाले.करिअर कट्टा विद्यार्थी संसदेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी शपथ ग्रहण केली. या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करिअर कट्टा समन्वयक प्रोफेसर डॉ. संजय सावते यांनी केले तर उपस्थितांचे आभार करिअर कट्टा समन्वयक प्रा. उत्तम महाले यांनी मानले.याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी दिलेला शब्द पाळला

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी. रणजीत ठाकूर**

....... दिनांक 14 ऑक्टोबर 2024 च्या शासन निर्णयाचे अनुपालन होऊन वाढीव टप्पा अनुदानाचा निधी पावसाळी अधिवेशनात वितरित व्हावा यासाठी आझाद मैदानात शिक्षक समन्वय संघांचे हुंकार आंदोलन चालू होते. या आंदोलनाची व्यापकता पाहून शिक्षकांना न्याय देण्याची भूमिका राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती. तसेच त्यांचा निरोप घेऊन मा. मंत्री महोदय संकटमोचक गिरीश महाजन यांनी दिनांक 18 जुलै 2025 पूर्वी आम्ही याच अधिवेशनात निधीची तरतूद करू असे आश्वासन दिले होते. तोच शब्द विचारात घेऊन आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते परंतु न्याय देणारे सरकार आमचे असून ते शब्द नक्कीच पाळणारे आहे याची प्रचिती आज निधीची तरतूद दिनांक 17 जुलै 2025 रोजी करून 63000 शिक्षकांना फडणवीस सरकारने न्याय दिलेला आहे. परंतु सदर प्रवास पाहता,

9 जुलै 2025 रोजी शिष्टमंडळाला शब्द दिल्याप्रमाणे आज मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत टप्पा वाढीचा विषय घेतला 14 ऑक्टोबर 2024 च्या शासन निर्णयानुसार वाढीव टप्पा देण्यात यावा यासाठी 5 जून पासून धरणे आंदोलन सर्व राज्यात सुरू केले होते, 30 जून ला पुरवणी मागणी मध्ये शासनाने कोणतीच तरतूद न



केल्याने 8 व 9 जुलै रोजी राज्यातील सर्व अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्या बंद केल्या होत्या याची दखल, शासनासह विरोधी पक्षांनी घेतली होती,त्यावेळी शासनाने आमच्या मागण्यांबाबत योग्य निर्णय घेऊन,अधिवेशन संपण्यापूर्वी योग्य तो निर्णय घेतला जाईल असे मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी जाहीर केले होते, त्यावेळी संकट मोचक मा गिरीश महाजन साहेब यांनी ही अतिशय महत्त्वाची भूमिका घेतली होती,

त्याप्रमाणे आज मंत्रिमंडळ बैठकीत आपला विषय मंजूर केला व 970 कोटी ची तरतूद केली व 14 ऑक्टोबर 2024 च्या शासन निर्णयानुसार निधी ला मंजुरी देण्यात आली, त्यामुळे 5 जून पासून सुरू असलेल्या आंदोलनाला यश मिळाले हा शिक्षकांच्या एकीचा विजय आहे

यामध्ये आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचा मोलाचा वाटा आहे, त्याच प्रमाणे आमदार मंगेशजी चव्हाण यांचे योगदान खूप मोठे आहे, तसेच सर्व शिक्षक व पदवीधर आमदारांची प्रयत्नांच्या जोरावर हे यश मिळाले आहे

खरे राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी जी एकी दाखवली व राज्यातील सर्व शाळा बंद करण्याबाबत जो निर्णय घेतला व त्या निर्णयाचा मान राखून सर्वानी शाळा बंद केल्या 20 ते25 हजार शिक्षक रस्त्यावर आले त्यामुळे हे यश मिळाले आहे, ही एकीची ताकद आपण दाखवली त्याचेच हे यश आहे, कोणा एकाचे यश नाही,

यामध्ये सर्व शिक्षक व पदवीधर आमदार तसेच काही माजी आमदार याचा ही मोलाचा वाटा विसरता येणार नाही,

आज मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली तसेच संकट मोचक गिरीशजी महाजन साहेब यांची भेट घेऊन त्यांचे मनापासून आभार मानले

मा मुख्यमंत्री यांच्या भेटीसाठी मा समित कदम व विजयसिंह माने (भैया) यांच्या प्रयत्नामुळे भेट झाली, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब,शिक्षण मंत्री दादाजी भुसे साहेब मा ना आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर,मा ना प्रवीण दरेकर,साहेब, आमदार मंगेश चव्हाण यांची भेट घेऊन आभार व्यक्त केले, यामध्ये सर्व शिक्षक व पदवीधर आमदार यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे

यावेळी समीत कदम,विजयसिंह माने,पुंडलिक रहाटे वैद्यनाथ चाटे मच्छिद्र सावंत, संजय डावरे,सदानंद लोखंडे, अजेटराव एस डी लक्ष्मण सोळंखी, अजय थुल संतोष पाटील हे उपस्थित होते,

*या निर्णयामुळे राज्यातील 63 हजार शिक्षकांना न्याय मिळाला आहे*

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## प्राचार्य साहेबराव जाधव यांचा शिक्षणाधिकारी धुपेमॅडम यांच्याहस्ते सत्कार

**:- रिसोड प्रतिनिधी**
**. राणजितसिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील कंकरवाडी येथील संत तुकाराम महाराज विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य साहेबराव जाधव यांना उत्कृष्ट प्रिन्सिपल अवॉर्ड जाहीर झाल्याबद्दल वाशिम जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी माध्यमिक मंगल धूपेमॅडम यांनी रिसोड तालुका मुख्याध्यापक सभेच्या भारत माध्यमिक शाळा रिसोड येथे झालेल्या आढावा बैठकीमध्ये शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी रिसोड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बद्रीनाथजी कोकाटे व वाशिम जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विनोद पाटील नरवाडे व प्राचार्य भांडेकर तसेच केंद्रप्रमुख व सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य व मुख्याध्यापिका उपस्थित होत्या. यावेळी रिसोड तालुक्यातील सर्व शाळांचा माननीय शिक्षणाधिकारी यांनी आढावा घेतला.



## ईपीएस राष्ट्रीय संघर्ष समिती रायगडच्या वतीने सोमवार २१जुलै रोजी मोहोपाडा येथील साई मंदिर येथे भव्य पेन्शनर मेळावाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**रसायनी वार्ताहर**

ईपीएस राष्ट्रीय संघर्ष समिती रायगडच्या वतीने रायगड जिल्ह्यातील पेण,पनवेल,खालापूर रोहा,अलिबाग तालुक्यातील विविध महामंडळे कंपन्या आस्थापना सहकारी व खाजगी संस्थांमधून सेवानिवृत्त झालेल्या अल्पपेन्शन धारकांसाठी सोमवार दि.२१जुलै रोजी सकाळी १०:३०वा. एच.ओ.सी कॉलनीतील मोहोपाडा येथील साई मंदिर येथे भव्य पेन्शनर मेळावा आयोजित करण्यात आला आहे तरी या पेन्शनर मेळाव्यामध्ये अल्पपेन्शन धारकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आले आहे.सध्या मिळणाऱ्या अल्प पेन्शनमध्ये वाढ होण्यासाठी राष्ट्रीय संघर्ष समितीचा लढा अविरतपणे केंद्र सरकार बरोबर सुरूच आहे परंतु अल्प पेन्शन धारकांसाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळ्या वाला मार्गदर्शन करण्यासाठी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोकराव राऊत,पश्चिम भारतचे संघटक सुभाष पोखरकर,महाराष्ट्राचे प्रांतीय संघटक अजितकुमार घाडगे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष इंद्रसिंग राजपूत,ठाणे जिल्हा अध्यक्ष मोहन राजपूत,पिंपरी चिंचवड अध्यक्ष तानाजी अण्णा काळभोर आदी मान्यवर पेन्शनर मेळाव्याला संबोधित करणार आहे.तरी या मेळाव्याला मोठ्या संख्येने पेन्शनर धारकांनी उपस्थित राहावे असे आवाहन उल्हास चित्रे,अरूण मानकामे,अशोक दराडे, डी.एस.बामगुडे आदींनी केले आहे.

## दिग्रस तालुक्यात २८ ग्रामपंचायतीवर येणार महीलाराज

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**

दिग्रस तील ५५ ग्रामपंचायतीच्या संरपचपदाच्या आरक्षणाची सोडत शुक्रवारला सकाळी ११ वाजता येथील तहसील कार्यालय उपविभागीय तथा नियंत्रण अधिकारी आशिष बिजवाल, तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी मयूर राऊत, नायब तहसिलदार तथा निवडणूक अधिकारी रामेश्वर तुपवने यांच्या उपस्थितीत काढण्यात आली. ५५ पैकी २८ ग्रामपंचायतीवर महीला सरपंच राहणार असून सर्वसाधारणसाठी २८ अनुसुचित जमातीसाठी सुटल्या १२ जागा यामध्ये यामध्ये सर्वसाधारण, वर्गातील महीला अनुसुचित जाती प्रवर्ग अनुसुचित जमाती प्रवर्ग महीलाचा समावेश राहणार आहे. तर उर्वरित ग्रामपंचायतवर याच प्रवर्गातील पुरूषांना स्थान मिळणार आहे. तर ५५ पैकी २८ जागावर सर्व साधारण १२ जागावर अनु जाती व जमाती ला स्थान मिळेल तालुक्यातील सावंगा खु अनु जाती महिला, देऊरवाडा (पु) अनु जाती महिला, विठाळा अनु जाती, काटी अनु जमाती महिला, सेवानगर अनु जमाती महिला, आष्टा अनु जाती महिला, वाई (लिंगी) अनु जाती महिला, झिरपुरवडी ना.मा.प्र महिला, साकरी ना.मा.प्र महिला, आरंभी ना.मा प्र महिला, ईसापुर ना.मा.प्र महिला, धानोरा बु ना. मा.प्र महिला, हरसूल ना. मा.प्र महिला, रामनगर ना.मा. प्र महिला, चिंचपात्र ना. मा.प्र महिला, तिवरी सर्वसाधारण , धानोरा (खु) सर्वसाधारण महिला, खेकडी सर्वसाधारण महिला, खंडापुर सर्वसाधारण महिला, रोहणादेवी सर्वसाधारण महिला, कळसा सर्वसाधारण महिला, वाई मेंढी सर्वसाधारण महिला, माळहिवरा सर्वसाधारण महिला, डोळंबा सर्वसाधारण महिला, सिंगद सर्वसाधारण महिला, रुई तलाव सर्वसाधारण महिला, मरसुळ सर्वसाधारण महिला, पेळू सर्वसाधारण महिला, वरंदळी सर्वसाधारण महिला निंभा सर्वसाधारण महिला राहणार आहे.

# कोट्यवधींची फसवणूक उघड! मुरुडमध्ये 'जास्त व्याज'चं आमिष दाखवून ८ कोटींहून अधिक रक्कम लाटली – प्रसन्न पुलेकर पोलिसांच्या ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

'महिन्याला दहा हजार रुपये व्याज मिळेल' या गोड आमिषाने मुरुड शहर व ग्रामीण भागातील जनतेची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या प्रसन्न पुलेकर याला अखेर मुरुड पोलिसांनी अटक केली आहे. पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून पुलेकर याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.प्रसन्न पुलेकर याने नागरिकांना "किमान एक लाख रुपये गुंतवा, आणि दर महिन्याला




दहा हजार रुपये व्याज मिळवा" अशा प्रलोभनाने गुंतवणुकीस प्रवृत्त केलं. या मोहजाळात फसलेल्या सुमारे १३६ नागरिकांनी मिळून जवळपास ८ कोटी १ लाख २५ हजार रुपयांचा आर्थिक फटका बसल्याची माहिती तक्रारीतून समोर आली आहे. या प्रकरणी मुख्य तक्रारदार महेश भगत यांच्या पुढाकाराने अनेकांनी मुरुड पोलीस ठाण्यात धाव घेतली.प्रसन्न पुलेकर सध्या एका दिवाणी प्रकरणात मुरुड न्यायालयात उपस्थित राहिला असताना, पोलिसांनी त्याला तत्काळ अटक केली. चौकशीत त्याच्या गुन्ह्यांची साखळी उलगडत गेली आणि अखेर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल करण्यात आला."जनतेचा सजगतेचा इशारा!"या प्रकारातून नागरिकांनी धडा घेतला पाहिजे की, 'लवकर पैसा मिळवण्याच्या मोहात न पडता, कोणत्याही आर्थिक योजनेत गुंतवणूक करताना खातरजमा करणे अत्यंत आवश्यक आहे.' केवळ जास्त व्याजाच्या आमिषाने पैसे गुंतवणे, हे आपल्या मेहनतीच्या कमाईशी गद्दारी ठरते.पत्रकार परिषद आणि जनआक्रोशाने फोडला मुखवटा फसवणूक झालेल्यांनी एकत्र येत पत्रकार परिषद घेऊन आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार दाखल करत हा प्रकार उजेडात आणला. जनतेच्या एकजुटीने पुलेकरवर कारवाई शक्य झाली हे विशेष.

"रेवदंड्यातील जनतेलाही सावध राहण्याची गरज!मुरुडमध्ये उघड झालेला हा प्रकार रेवदंड्यासह संपूर्ण परिसरासाठी मोठा इशारा आहे. 'जास्त व्याज', 'लवकर श्रीमंत व्हा' अशा आमिषांना बळी न पडता कोणतीही गुंतवणूक करताना योग्य माहिती व खात्री करणे आवश्यक आहे. अशी फसवणूक आपल्याही भागात होऊ शकते, याची जाणीव ठेवून सजग राहणं गरजेचं आहे.

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या रिसोड तालुकाध्यक्षपदी नारायणराव आरु पाटील यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**...... रिसोड प्रतिनिधी रणजीत ठाकूर.**

रिसोड : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने पत्रकारहितासाठी कार्यरत असणाऱ्या नारायणराव आरू पाटील यांची रिसोड तालुकाध्यक्षपदी पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या निवडीचे पत्र नुकतेच देण्यात आले. या निवडीसाठी संघाचे संघटक संजय भोकरे यांच्या सूचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकोडे, कार्याध्यक्ष निलेश सोमाणी, सरचिटणीस विश्वास आरोटे, विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, विदर्भ कार्याध्यक्ष अजय खेडकर, अमरावती विभागीय अध्यक्ष सुनील फुलारी यांच्याशी सल्लामसलत करून ही घोषणा करण्यात आली. नारायणराव



आरू पाटील हे पत्रकार क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असून, ग्रामीण पत्रकारांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवित आले आहेत. त्यांच्या या निवडीमुळे स्थानिक पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. संघटनेच्या ध्येयधोरणानुसार पत्रकार संघटना मजबूत करणे, पत्रकारांचे प्रश्न शासन दरबारी मांडणे व त्यांना न्याय मिळवून देणे यासाठी ते कटिबद्ध राहतील, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे. प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी,यांचे हस्ते आणी डॉ .बाहेती,प्रभाकर काळे,प्रा. रवी अंभोरे,पवन छित्तरका ,शितल धांडे, यांच्या उपस्थितीत यांनी निवडीचे पत्र दिले.आणी अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.रिसोड तालुकाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करतांना नारायणराव आरू पाटील म्हणाले, "माझ्यावर ठेवलेल्या विश्वासाबद्दल मी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे आभारी आहे. संघटनेने मला दिलेली ही जबाबदारी मी पूर्ण प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. पत्रकार संघटना मजबूत करणे, स्थानिक तसेच ग्रामीण पत्रकारांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडणे आणि पत्रकार बांधवांचे हक्क व हितसंबंध अबाधित राहावेत यासाठी मी कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त केले.यावेळी संघटनेचे पदाधिकारी गणेश देगावकर, प्रदिप देशमुख,अशोक चोपडे, डॉ.रामेश्वर रंजवे, धैर्यशील जोशी, सचिन गांजरे,शेख मोहम्मद सरवर , कैलास महाजन, इत्यादी सदस्य उपस्थित होते.

## जळगांव येथे विठ्ठल रुख्मिणी व संत शिरोमणी सावता महाराज यांच्या मुर्तीची भक्तीभावाने प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहन सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे**

तालुक्यातील जळगांव येथे विठ्ठल रुख्मिणी व संत शिरोमणी सावता महाराज यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना पारंपरिक वाद्य टाळ मृदंगाच्या गजरात मंत्रघोषाने करण्यात आली गुरुवारी सायंकाळी मुर्तीची गावातून भव्य दिव्य मिरवणूक टाळ मृदंगाच्या रुबाब साऊंड च्या गजरात काढण्यात आली अबालवृद्धासह भाविक मोठ्या संख्येने मिरवणूकीत सहभागी झाले होते. आज शुक्रवारी सकाळी ह.भ.प.महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांचे किर्तन व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली मोठ्या उत्साहात हा सोहळा पार पडला तालुक्यातील जळगांव येथे विठ्ठल रुक्मिणी व संत शिरोमणी सावता महाराज यांच्या मुर्तीची गावातुन प्रदक्षणा काढण्यात आली लहान मुली डोक्यावर कलस घेऊन व हातात भगव्या पताका घेऊन चिमुकले व तरुण, वृद्ध,महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.गुरुवारी १७ जुलै रोजी सायंकाळी मुर्ती व कलश सवाद्य मिरवणूक पार पडली तर शुक्रवारी दि.१८ रोजी सकाळी ह.भ.प.महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांचे जाहिर हरिकिर्तन होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली धार्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना व कलश रोहन सोहळा उत्साहात पार पडला

# पत्रकारांवर हल्ला केल्यास ठरेल दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा

### महाराष्ट्र राज्य ठरले पत्रकार संरक्षण कायदा लागू करणारे भारतातील पहिले व एकमेव राज्य

### पत्रकार संरक्षण कायदा २०१७ आणि शासनाची स्पष्ट भूमिका ; मुंबई भाजपचे किशोरभाई म्हात्रे यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा :**

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि जनतेच्या समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधणारे पत्रकार हे केवळ बातमीसाठी धावणारे नाहीत, तर ते एक सामाजिक जबाबदारी पार पाडणारे कार्यकर्तेही आहेत. त्यामुळे पत्रकारांवर होणारी अपमानास्पद वागणूक, शिवीगाळ, धमक्या आणि मारहाणीच्या घटनांकडे शासन अत्यंत गांभीर्याने पाहत आहे. असे वक्तव्य मुंबई भाजपचे किशोरभाई म्हात्रे यांनी केले आहे. त्यांनी सांगितले की, पत्रकारांना अपशब्द वापरणे, अपमानित करणे किंवा धमकी देणे हा केवळ असभ्यपणा नसून गंभीर दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा ठरतो. महाराष्ट्रातील कायदेशीर संरक्षण पत्रकार संरक्षण कायदा २०१७ साठी महाराष्ट्र हे भारतातील पत्रकार संरक्षण कायदा लागू करणारे पहिले आणि एकमेव राज्य आहे.

७ एप्रिल २०१७ रोजी हा कायदा विधानसभेत मंजूर करण्यात आला, तर ८ डिसेंबर २०१९ पासून तो प्रत्यक्षात लागू सुद्धा करण्यात आला. या कायद्याअंतर्गत खालील तरतुदी करण्यात आल्या आहेत ते पुढीलप्रमाणे ०१) शिक्षा आणि दंड – पत्रकारावर हल्ला करणाऱ्यास ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ५०,००० रुपयांपर्यंतचा दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. २) गुन्ह्याचे स्वरूप – अशा प्रकारचे गुन्हे हे दखलपात्र ( COGNIZABLE ) आणि अजामीनपात्र ( NON-BAILABLE ) असतात. म्हणजेच, पोलिसांना वॉरंटशिवाय अटक करण्याचा अधिकार असतो आणि जामीन लगेच मिळू शकत नाही. ३) नुकसानभरपाई – जर एखाद्या पत्रकाराला किंवा मिडिया संस्थेच्या कार्यालयाला





नुकसान पोहचवलं गेले, तर त्या नुकसानाची भरपाई गुन्हेगाराकडून वसूल करण्याची तरतूद आहे. ४) तपासाची जबाबदारी – पत्रकारांवरील हल्ल्याची चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर होते. ०५) भारतीय न्याय संहिता अंतर्गत अन्य कायदेशीर कारवाई – महाराष्ट्र पत्रकार संरक्षण कायद्याशिवाय, भारतीय दंड संहितेच्या ( IPC ) विविध कलमानुसार पत्रकारांवर होणाऱ्या अपशब्द, धमक्या आणि मारहाणीवरही कारवाई केली जाते. ०६) कलम ३२३ मारहाण – १ वर्ष कारावास, दंड अथवा दोन्ही, कलम ५०४ शांततेचा भंग करणारा अपमान – २ वर्ष कारावास, दंड किंवा दोन्ही, कलम ५०६ जीवे मारण्याची किंवा गंभीर इजा करण्याची धमकी – कठोर शिक्षा. यात सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट आदेश असून फक्त शिवीगाळ केल्याने आयपीएस कलम २९४ (ब) अन्वये गुन्हा होत नाही, परंतु ती शिवीगाळ जर शांतता भंग करण्याच्या हेतूने, धमकीच्या स्वरूपात किंवा सार्वजनिक ठिकाणी केली असेल, तर ती दंडनीय गुन्हा ठरतो. पत्रकारांवरील हल्ल्यांचे उदाहरण सामाजिक जबाबदारीचा अपमान – अनेक वेळा पत्रकारांनी समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रश्न उपस्थित केल्याने त्यांना धमक्या, अपशब्द किंवा मारहाणीचा सामना करावा लागतो. ही कृती केवळ त्या पत्रकारावरील हल्ला नसून लोकशाही व्यवस्थेवरचा आघात आहे. त्यामुळे अशा घटनांमध्ये पत्रकारांनी तक्रार नोंदवून कायदेशीर संरक्षणाचा लाभ घ्यावा, हे अत्यंत आवश्यक आहे. निष्कर्ष असा की, पत्रकारांना शिवीगाळ करणे, धमकावणे वा अपमान करणे हे कायद्याने गुन्हा असून, तो करणाऱ्यांवर कडक कारवाईची तरतूद आहे. पोलिसांनी अशा प्रकरणांकडे केवळ तक्रार म्हणून न पाहता, लोकशाही व्यवस्थेच्या सुरक्षेच्या दृष्टीने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. माध्यमकर्मींचे स्वातंत्र्य टिकवणे ही समाजाची जबाबदारी आहे. जर माध्यमे अबाधित राहिली, तरच समाजाला खरी माहिती मिळू शकते आणि म्हणूनच पत्रकारांना असुरक्षित वाटण्याची वेळ येणे हे कुठल्याही प्रगत लोकशाहीसाठी दुर्दैव आहे. जर तुम्ही पत्रकार असाल आणि तुमच्याशी गैरवर्तन झाले असेल, तर तातडीने पोलिसांत तक्रार नोंदवा आणि कायदेशीर कारवाईची मागणी करा. तुमचे हक्क सुरक्षित आहेत तुम्ही एकटे नाहीत. असे प्रतिपादन मुंबई भाजपाचे माजी अध्यक्ष किशोरभाई म्हात्रे व महाराष्ट्र शासन मान्य प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डी. टी. आंबेगावे व राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांनी केले आहे.

## विंचूर ग्रामपंचायतीची अतिक्रमण काढण्यास ग्रामसेवक रविंद्र धुंदाळे यांची टाळाटाळ होत असल्याचा विजय दरेकर यांचा आरोप

### तक्रारदार विजय दरेकर यांची तीव्र नाराजी

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :-** विंचूर येथील डावरे कॉम्प्लेक्सजवळील




बेकायदेशीर अतिक्रमण काढण्यास विंचूर ग्रामपंचायत टाळाटाळ करत असल्यामुळे तक्रारदार विजय दरेकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. निफाड पंचायत समितीच्या लेखी आदेशानंतरही केवळ नोटिसा पाठवून ग्रामपंचायत वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. विजय दरेकर यांनी पंचायत समितीकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, डावरे कॉम्प्लेक्समधील गाळा क्र. १ व २ हे चंद्रकांत डावरे व त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावर आहेत. या गाळ्यांच्या दक्षिण बाजूस नारायण नामदेव शिरसाठ व महेश नारायण शिरसाठ यांनी बेकायदेशीरपणे पत्र्याचे शेड व सिमेंट काँक्रीटचा पाया घालून अतिक्रमण केले आहे. संबंधित जागा सार्वजनिक वापरासाठी असून, अतिक्रमणकर्त्यांचा या जागेवर कोणताही हक्क नाही. या अतिक्रमणामुळे गाळ्यांचा समोरील भाग झाकला गेला असून, ग्राहकांना अडचणी येत आहेत, असेही दरेकर यांनी तक्रारीत नमूद केले आहे. तसेच, सदर मिळकत बिनशेती परवानगीनुसार असून, त्याच्या अटींचा भंग झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

*सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील व विस्तार अधिकारी राजेश थोरात यांनी स्वतः येऊन पाहणी केली व त्यांनी सांगितले की ही जागा अतिक्रमण आहे हे अतिक्रमण तात्काळ काढण्यास सांगितले त्यानुसार ग्रामपंचायत कार्यालयाने तीन नोटीसा पोस्टाने पाठवले परंतु त्यांनी स्वीकारली नाही आत्ता दोन दिवसात नोटीस संबंधित जागेवरती जाऊन चिटकवण्यात येईल व संबंधित अतिक्रमण लवकर लवकर हटवण्यात येईल प्रतिक्रिया :- ग्रामसेवक रवींद्र धुंदाळे

*निफाड पंचायत समितीने चौकशी समिती नेमून दिनांक २० मे रोजी ग्रामपंचायतीला अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. मात्र, ग्रामपंचायत केवळ नोटिसा देऊन चालढकल करत असल्यामुळे पंचायत समितीच्या आदेशानंतरही अद्याप अतिक्रमण काढण्याबाबत कोणतीही प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नाही
**प्रतिक्रिया:- विजय दरेकर**

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे पक्षाची इंदापूर येथे बैठक संप्पन्न

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**



आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच इंदापूर नगरपरिषद निवडणुकीच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी इंदापूर तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने आज शासकीय विश्रामगृह इंदापूर या ठिकाणी प्रमुख पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख संजय काळे,तालुकाप्रमुख नितीन शिंदे,शहर प्रमुख मेजर महादेव सोमवंशी, तालुका समन्वयक अरुण पवार,तालुका संघटक सुदर्शन रणवरे यांच्यासह उपतालुकाप्रमुख आप्पासाहेब डोंगरे,उपतालुकाप्रमुख संदीप चौधरी, उपतालुकाप्रमुख सोमनाथ शेंडे, युवासेना तालुकाप्रमुख सचिन इंगळे,युवासेना शहरप्रमुख अविनाश खंडाळे,शिवसेना उपशहरप्रमुख संतोष क्षीरसागर,उपशहरप्रमुख बंडु शेवाळे,उपशहरप्रमुख दादा देवकर,विभागप्रमुख रणजित बारवकर, विभागप्रमुख अभिजित पाटील,विभागप्रमुख महादेव चोपडे,उपविभागप्रमुख विजय तरंगे, सुदर्शन माने, ब्रम्हदेव थोरात आदी शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख आ.सचिन अहिर यांच्या सूचनेनुसार आगामी निवडणुकी संदर्भात पदाधिकाऱ्यांशी बैठक घेऊन चर्चा केली आहे. बैठकीत झालेल्या चर्चेचा अहवाल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना पाठण्यात येणार आहे असे शिवसेना तालुकाप्रमुख नितीन शिंदे यांनी सांगितले.

यावेळी शिवसेना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुर्ण ताकदीने लढणार असून त्या अनुषंगाने तयारीचा पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला. शिवसेना लवकरच प्रत्येक नव्याने झालेल्या जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात बैठका घेणार असून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त तालुकाभर विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार आहेत. लोकांच्या प्रश्नावर कायमच आक्रमक भूमिका घेणारी शिवसेना पुन्हा तीच आक्रमकता घेऊन मैदानात उतरणार आहे.

# कोकणच्या कला संस्कृतीला वाव देण्यासाठी सुवर्ण-भास्कर नमन स्पर्धा २०२५ च्या बक्षीस वितरणचे २३ जुलैला मुंबई येथे आयोजन

## वसेना नेते, वि.स. गटनेते, मा. मंत्री, आमदार श्री. भास्कर जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत साहित्य संघ मंदिर, गिरगांव येथे होणार पारितोषिके वितरण

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

परशुरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कोकणभूमीत अनेक कलांचा विकास झाला आहे.त्यामध्ये नमन(खेळे),शक्तीतुरा(जाकडीनृत्य) भारुड,डफावरीळ पोवाडे इ.कलांचा समावेश आहे.कोकणातील विशेषतः रत्नागिरी जिल्हातील नमन(खेळे)या लोककलेची प्रसिध्दी जगभर पसरली आहे. श्री गणरायाचे आगमन,मृदंग ,ढोलकीच्या तालावर ठेका धरणारी नटखट गवळण ,काल्पनिक पौराणिक वगनाट्य सादर करणारी ही नमन लोककला कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना,शासनाचे अनुदान नसतानाही कोकणवाशीय जोपासत आहेत.या लोककलेला फार प्राचीन काळापासून रत्नागिरी ,चिपळूण,गुहागर,संगमेश्वर ,देवरुख,लांजा ,राजापूर ,मंडणगड या तालुक्यातील लोकांनी ही लोककला जोपासून शासनाच्या,भारत सरकारच्या अनेक योजना या लोककलेतून लोकांपर्यंत पोहचवून त्याविषयी जनजागृती करण्याचे काम पार पाडले आहे.झाडे लावा-झाडे जगवा,पाणी वाचवा,नशाबंदी ,वृक्षतोड थांबवा,स्त्रीभ्रुणहत्या,शिक्षणाचे महत्त्व इ.विषयांवर या लोककलेतून लोकांपर्यंत संदेश देण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. याबाबतची कथा अशी की,अठराव्या शतकात शामजी नाईक काळे यांनी कर्नाटकातून जो लोककला प्रकार महाराष्ट्रात आणला.त्याचे दोन भाग होऊन एक दशावतार म्हणून दक्षिण कोकणात प्रसिध्द पावला.तर नमन उतर कोकणात होऊ लागला.नृत्य ,नाट्य,संगीत यांनी परिपूर्ण असा हा लोककला प्रकार "यक्षगान"या कर्नाटकातील लोककला प्रकाराशी साम्य दर्शवतो.उत्सव प्रिय कोकणात सण,समारंभ म्हटले की मन उचंबळून आल्याखेरीज राहत नाही.प्रामुख्यानेसणवारीत,लग्न समारंभात,सार्वजनिक महोत्सव इ.मध्ये कोकणी संस्कृतीतील विविध लोककला आणि लोकनृत्य पहायला मिळतात.जगाच्या पाठीवर कोकणी माणूस कोठेही असला तरी या उत्सवासाठी तो आपल्या गावाकडे धाव घेतल्याशिवाय राहत नाही. कोकणात या उत्सवात "कुणबी" समाजाची लोककला व लोकनृत्य या दृष्टीने महत्त्वाची भूमिका आहे. होती व असेलच .लग्नकार्यात कोकणची लोककला नमन,दशावतार ,तमाशा तर गणपती उत्सवात जाकडीनृत्य,काटखेळ,टिप-या फुगड्या ही लोकनृत्य पहावयास मिळतात.लोककला व लोकनृत्य यातून प्राचीन कोकणच्या संस्कृतीचे जतन आपोआपच होत आहे.यापुढे ही या लोककलांचे जतन होणे काळाची गरज आहे.कोकणचे खेळे-नमन ही लोककला पूर्वी वीज नसताना पेट्रोमँक्सच्या प्रकाशात रंगायची. आज मात्र ही कला हँलोजनच्या रंगीबेरंगी दुनियेत रंगताना दिसते.







काळ बदलला मात्र ग्रामीण जनतेच्या मनोरंजनाचे साधन मात्र नमन-खेळे ,शक्तीतुरा हेच आहेत.

नमन खेळाची सुरुवात गावदेवीची राखण देऊन मृदंगावर थाप पडते.लग्नाच्या कार्यात,होली(शिमगोत्सव)या काळात या खेळाला बहर येतो.कोकणच्या या नमन लोककलेत ३०-४० लोक सहभागी असतात.एका विशिष्ट झगेदार पोशाखात हे कलाकार दोन रांगेत आडवे उभे राहतात.प्रत्येकाच्या हातात टाळ,डोक्यावर रंगीबेरंगी पगडी,अंगाखांद्यावर रंगीत ओढण्या असतात.या प्रत्येक कलाकारांना "खेलीया"असे म्हणतात.मध्यभागी सुत्रधार असतो.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तो करत असतो. देवाच्या नावाने हा सूत्रधार नमनाला सुरुवात करतो.बारा किंवा सोळा नमने गायली जातात.सुरुवातीला म्हटलं जाते की,"पहिले नमन हो पहिले नमन..धरती मातेला हो धरती मातेला,दुसरे नमन हो दुसरे नमन.. चंद्र सुर्याला हो चंद्रसुर्याला...असे बोलत बोलत दहावे नमन हो दहावे नमन.दशमुखी रावणाला हो दशमुखी रावणाला! अशाप्रकारे नमने गायली जातात.यामध्ये दोन मृदंग वाजवणारे असतात.एका पायावर जड मृदंग घेऊन ठेका धरुन मृदंग वाजविणारे नाचू लागल्यावर प्रेक्षकांना दाद द्यावीच लागते.या नमन खेळे प्रकारात पोशाख म्हणून डोक्याला फेटा,टिळा,कानात डुल घातलेले असतात.संपूर्ण शरिरभर स्त्रियांच्या घाग-याप्रमाणे एक वस्त्र परिधान करुन लोकांचे मनोरंजनाचे काम केले जाते.गळ्यात मण्यांच्या माळा घातलेल्या असतातच.यामध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे मृदंग वाजवण्याची कला असते.शिवाय या मृदंग चा आवाजही मंत्रमुग्ध करणाराच असतो.काही ठिकाणी नमनात टिप-या देखील वापरल्या जातात.

नमन या लोकनृत्य मध्ये गणगौळण मध्ये अनेक सोंगे असतात.सोंगात प्रथम मान गणपतीरायाचा असतो.गणपती पूजन व गणपती गाणे होते.गणेश पुजनात गणेशाची आख्यायिका असते.ही सोंगे झाडांच्या लाकडापासून बनवलेली असतात.मात्र आजच्या तारखेला ही सोंगे अनेक प्रकारची हलकी व प्लास्टिक ,फायबर याची बघायला मिळतात.गणपतीच्या आगमनवेळी इतर सोंगेही दाखवली जातात.यामध्ये नटवा असतो.शंखासूर,वाघ,हरणइ. असून या प्रकारात वापरल्या जाणाऱ्या तलवारी लाकडी असतात. गण झाल्यावर "गवळण" प्रकाराला सुरुवात होते.हा भाग खुपच मजेदार व ऐकण्यासारखा असतो. दही,दूध ,लोणी घेऊन गवळणी मथूरेच्या बाजाराला जात असतात. त्यांची वाट(रस्ता )गोकुळातील पेंद्या,सुदामा(श्रीकृष्ण सवंगडी) वाट अडवतात.त्यावेळी गोपीका व पेंद्या,सुदाम यांच्यातर्फे अनेक गाणी व वेगवेगळ्या कला सादर होतात. कृष्णाचे संवगडी गवळींची वाट अडवत त्यांच्या बाजारात विक्रीसाठी जाणाऱ्या मालाची लुट करतात.माठही फोडतात.यावेळी मावशी(गवळणी मधील जेष्ठ )अनेक कला सादर करुन नमन रसिकांना हसायला भाग पाडते.गवळणी गाणं म्हणताना या संवगडींना म्हणतात "दहीदुधाचे माठ घेऊनी चाललो मथूरेच्या बाजारी...दह्यादुधाचे नुकसान कान्हा तु का रे करी...!कारण कान्हा रस्त्यामध्ये उभा राहून गवळींची वाट अडवत असतो.त्यावेळी गवळणी त्याला विनंती करतात की,कान्हा सोड आमची वाट,आम्हा जाऊ दे बाजारी...दह्यादुधाने भरल्या घागरी.....! अशा त-हेरे गवळणी नंतर कौटुंबिक जीवनावर आधारीत पण एक चांगला संदेश देणारी छोटीशी नाटीका(फार्स)सादर केली जाते.या नाटीकेचा विषय सामाजिक जनजागृतीचा संदेश देणारी असतो. या संपूर्ण नमन खेळात शिपाई हे आदिच्या पोलीस दलातील हवालदार प्रमाणे असतात.गंभीर विषय विनोदी करुन सांगताना त्यातून अनेक संदेश दिले जातात.आपल्या अभिनयातून सामाजिक परिस्थितीचा आढावा घेत असतात. कोकणच्या कला संस्कृतीस वाव देण्यासाठी सुवर्ण-भास्कर नमन स्पर्धा २०२५(मुंबई उपनगर आणि परिसर)मध्ये शिवसेना नेते,गटनेते,आमदार मा. श्री. भास्कर जाधव यांच्या संकल्पनेतुन गुहागर विधानसभा क्षेत्रातील नमन कलावंताच्या कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी एका अनोख्या स्पर्धेचे आयोजन केले होते.१ जानेवारी २०२५ पासून १ मे २०२५ पर्यंत या स्पर्धेचा कालावधी होता.विषेश आकर्षण पारितोषिक संकासुर नृत्यलाही तेवण्यात आले आहे.प्रथम पारितोषिक रोख रू.५१०००/-तर दुसऱ्या क्रमांक पारितोषिक रोख रू. ३१०००/-, तृतीय पारितोषिक रोख रू. २१०००/- तर उत्कृष्ठ कलाकार ११०००/-,उत्कृष्ठ गित रचना ११०००/-, उत्कृष्ठ गायन ११०००/-, उत्कृष्ठ सुमधुर संगित ११०००/- अशी पारितोषिक ठेवण्यात आली आहेत. स्पर्धा कालावधीत नेमणूक केलेले परीक्षक येऊन परीक्षण करत होते. कोकणच्या कला संस्कृतीस वाव देण्यासाठी सुवर्ण-भास्कर नमन स्पर्धा २०२५(मुंबई, ठाणे उपनगर आणि परिसर)शिवसेना नेते, वि.स. गटनेते, मा. मंत्री, आमदार श्री. भास्कर जाधव यांच्या संकल्पनेतुन, गुहागर विधानसभा क्षेत्रातील, नमन कलावंतांच्या कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी, एका अनोख्या स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर स्पर्धेचा कालावधी पूर्णत्वास गेला असून, निकाल व पारितोषिक वितरण सोहळा बुधवार दि.२३/०७/२०२५ रोजी सायं. ५:३०मि. साहीत्य संघ मंदीर गिरगाव, मुंबई या ठिकाणी, मा. श्री भास्कर जाधवसाहेब व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्याचे आयोजिले आहे.तरी आपल्या सहकाऱ्यांनासह आपण उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहनम. विक्रांत भास्कर जाधव( युवासेना कार्यकारिणी सदस्य मा. अध्यक्ष रत्नागिरी जिल्हा परिषद ),श्री. महेश सु. गोवळकर यांनी केले आहे.

---

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची डॉ.कपिल डी.जगताप यांना पी.एच.डी. पदवी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :- जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** इंदिरा गांधी कला महाविद्यालय येथील डॉ.कपिल डी. जगताप यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देण्यासाठी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (PHD)पदवी प्रदान करण्यात आली आहे. "सिन्थेसिस ऑफ ग्राफेन (MNO2, TIO2, ZNO) मेटल ऑक्साइड बेस्ड नॅनो कॉम्पोसिट्स फॉर इलेकट्रोकेमिकॅल सुपरकॅपॅसिटर एप्लिकेशन " या विषयावर त्यांनी आपले पीएचडी प्रबंध यशस्वीरित्या पूर्ण केला असून,या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ.राजेश व्ही.बर्डे यांचे मार्गदर्शन लाभले,डॉ.कपिल डी. जगताप यांचे हे संशोधन कार्य विषयाच्या अनुषंगाने मौलिक असून, त्यात सैद्धांतिक तसेच प्रायोगिक विश्लेषणाचे संतुलित सादरीकरण करण्यात आले आहे. त्यांच्या अभ्यासाची दखल घेत विद्यापीठाने त्यांना पीएचडी पदवी बहाल केली. या यशाबद्दल डॉ.कपिल डी.जगताप यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. संस्थेचे अध्यक्ष व माजी शिक्षणमंत्री आदरणीय प्रा.वसंतराव पुरके यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेछा दिल्या,तसेच कुटुंबीय,प्राचार्य,प्राध्यापक वर्ग,मित्रपरिवार आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांनी केलेले हे संशोधन भविष्यातील संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरेल,असा विश्वास त्यांचे मार्गदर्शक प्रा.डॉ.राजेश व्ही.बर्डे यांनी व्यक्त केला.




## संत शिरोमणी सावता महाराज पुण्यतिथी घरोघरी साजरी करून युवकांनी व्यसनमुक्त होण्याचा संकल्प करावा.:- सौ.वर्षा शिंदे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** संत शिरोमणी सावता महाराज यांची पुण्यतिथी यंदा केवळ पूजाअर्चेपुरती मर्यादित न ठेवता, ती सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक पाऊल ठरावी असे मत सावता सेनेच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ.वर्षा शिंदे यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी सांगितले की "संत सावता महाराज हे कार्य, श्रद्धा आणि समाज सेवेचे प्रतीक होते. त्यांनी शेती करताना समाजाला समतेचा, शुद्ध आचरणाचा आणि भक्तीमार्गाचा संदेश दिला. त्यांच्या पुण्यतिथी निमित्त युवकांनी एकत्र येऊन व्यसनमुक्त समाज घडवण्याचा संकल्प करावा, हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. "संतांच्या पुण्यतिथी निमित्त घरोघरी दीप प्रज्वलन, अभंग गायन, हरिपाठ आणि सामूहिक प्रार्थना घेण्यात यावी, असे आवाहन त्यांनी या वेळी केले. या दिवशी युवकांनी तंबाखू, दारू, गांजा या सारख्या व्यसनांपासून कायमचा संयम बाळगण्याचा संकल्प करून आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवावा असे ही त्यांनी सांगितले. संत सावता महाराज यांच्या जीवनचरित्रातून प्रेरणा घेऊन युवकांनी समाजात बंधुभाव, सेवा आणि स्वच्छतेचा संदेश पसरवावा, असे आवाहन करत "संतांचा मार्ग म्हणजेच स्वच्छ जीवनाची वाट!" असा संदेश त्यांनी दिला. या उपक्रमातून समाजात व्यसनमुक्तीचा नवा आदर्श निर्माण होईल आणि संतांचे विचार खऱ्या अर्थाने आचरणात येतील असा विश्वास सौ.वर्षा शिंदे यांनी व्यक्त केला आहे.



# ६५ इमारतींसंदर्भातील आंदोलकांच्या संघर्षाला यश

## उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या कार्यालयात निर्णयात्मक बैठक

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**.मुंबई :** आझाद मैदान येथे झालेल्या ६५ इमारतींच्या धरणे आंदोलनानंतर, उद्योगमंत्री मा. तानाजी सावंत यांनी स्वतः आझाद मैदानात येऊन आंदोलकांची भेट घेतली व त्यांना मंत्रालयात बोलावून घेत तत्काळ योग्य निर्णय घेण्याचं आश्वासन दिलं. या आश्वासनानंतर १६ जुलै रोजी उद्योगमंत्री मा. उदय सामंत यांच्या कार्यालयात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीसाठी नगरविकास विभागाचे मुख्य सचिव असीम गुप्ता, कल्याण-डोंबिवली महापालिकेचे आयुक्त अभिनव गोयल, कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, उद्धव ठाकरे गटाचे दीपेश म्हात्रे तसेच ६५ इमारतींच्या प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत खालील निर्णय जाहीर करण्यात आले: 1. ज्या जमिनींवर ६५ इमारती उभ्या आहेत त्या भूखंडांचा मालकी हक्क संबंधित सोसायट्यांना देण्याबाबत सकारात्मक निर्णय.
2. वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्यासाठी शासन सकारात्मक असून, या प्रक्रियेसाठी रहिवाशांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. 3. DP आराखड्यातील आरक्षणांपैकी DP रोड वगळता इतर आरक्षणे काढण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन.
या निर्णयामुळे ६५ इमारतीमधील हजारो रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांचा संघर्ष फलद्रूप ठरला आहे, असे दीपेश म्हात्रे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. या बैठकीसाठी तातडीने पुढाकार घेतल्याबद्दल दीपेश म्हात्रे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत, UD विभाग, तसेच आंदोलनास पाठींबा देणारे तानाजी सावंत यांचे आभार मानले. शिव आराधना सेविंग, शिवदृष्टी कोपरगाव, डोंबिवली वेस्ट, तसेच संतोष प्रजापती, अभिजीत बुट्टे पाटील, पार्थ मनोर महाडिक यांनी देखील या आंदोलनात सक्रिय सहभाग घेत मोठे योगदान दिले. सर्व रहिवाशांना आता आपली कागदपत्रे लवकरात लवकर शासनाकडे सादर करावीत, जेणेकरून ही प्रक्रिया जलद गतीने पूर्ण होईल, असे आवाहन करण्यात आले आहे. हा लढा थांबवण्याचा नाही, तर घरे वाचवण्याचा आणि हक्क मिळवण्याचा आहे. एकजुटीने हा लढा यशस्वी करूच, असा विश्वास दीपेश पुंडलिक म्हात्रे यांनी व्यक्त केला.

















## सुभाषनगर येथील जिल्हा परिषद शाळेतील भावी मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क.

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी:-राजेश भडांगे**

विंचूर -निफाड तालुक्यातील सुभाष नगर येथील विद्यार्थ्यांनी बजावला मतदानाचा हक्क शालेय जीवनातच विद्यार्थ्यांनी लोकशाहीने बहाल केलेल्या मतदानाचा हक्काबद्दल जनजागृती व्हावी तसेच मतदार जनजागृती होऊन मतदानाची टक्केवारी वाढावी या उद्देशाने जिल्हा परिषद शाळा सुभाष नगर येथील उपक्रमशील. पदवीधर शिक्षक.यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी लोकशाहीची शाळा लोकोत्सव अभिरुप मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी शपथविधी मोठ्या उत्साहाने संपन्न झाला यावेळी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता यावेळी शाळेचे मुख्याध्यापक कैलास देव्हाड बिबे सर, पवार सर, बडे सर शिंदे सर, काकवीपुरे मॅडम, शिंदे सर साबळे सर, पठाडे सर यांनी उपस्थितांना फुल गुच्छ देऊन स्वागत केले

लोकशाहीची शाळा लोकोत्सव उपक्रमांतर्गत या मतदार जनजागृती व्हावी यानिमित्ताने वर्गातील विद्यार्थ्यांचे शालेय वर्ग मित्र मंडळ निवड केली अभिरुप मतदान प्रक्रिया राबवून लोकशाहीचा अनुभव दिला

**प्रतिक्रिया:- चंदू लांडबले ग्रा.प सदस्य सुभाष नगर**

लोकशाही पद्धतीने निवडणूक घेऊन उपक्रमांतर्गत सुभाष नगर शाळेत घेण्यात आलेल्या अभिरूप मतदान प्रक्रिया हा विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीचा अनुभव देणारा धडा आहे

**प्रतिक्रिया :-कैलास देव्हाड मुख्याध्यापक सुभाष नगर जिल्हा परिषद शाळा**

आमच्या वर्गाची निवडणूक झाली प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया समजून घेत गुप्त पद्धतीने मतदान करण्याचे हक्क बजावला माझी लोकशाही पद्धतीने मतदान घेऊन मी निवडून आले.

**प्रतिक्रिया :-संजीवनी सोदक. विद्यार्थिनी कॅप्टन जिल्हा परिषद शाळा सुभाष नगर**







## अखेर त्या महिलेचे मृतदेह 56 तासांनी शोधण्यात रेस्क्यू टीमला यश

### अंबा नदीत उडी मारलेली घटना

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**



अंबा नदी वरील ऐतिहासिक पुलावरून बुधवार 16 जुलै रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास उडी मारलेल्या अलका जाधव या महिलेचा मृतदेह सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली एस व्ही आर एस एस या रेस्क्यू टीमला साधारण 56 तासांच्या अथक परिश्रमानंतर धरमतर खाडीत जेएसडब्ल्यू कंपनीच्या पाठीमागील बाजूस शोधण्यात यश आले. अंबा नदीला मंगळवार 15 जुलै रोजी पूर आल्याने नदीला मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह होता या प्रवाहात चिकणी आदिवासी वाडी वरील अलका जाधव यांनी उडी मारल्यानंतर त्या वाहून गेल्या होत्या, त्याची माहिती मिळताच सहा. पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस व आपत्ती व्यवस्थापन एस व्ही आर एस एस या रेस्क्यू टीमने तिचा शोध मोहीम सुरू केली. प्रयत्नांना अखेर यश आले असून अलका जाधव या महिलेचा मृतदेह शुक्रवार 18 जुलै रोजी सायंकाळी 04.00 वाजण्याच्या दरम्यान धरमतर खाडीत जे एस डब्ल्यू कंपनीच्या परिसराच्या मागील बाजूस नदीकिनारी सापडला आहे. नदीमधील पाण्याच्या तीव्र प्रवाहामुळे शोध मोहिमेला अडथळे निर्माण होत असताना देखील रेस्क्यू टीमने घेतलेल्या अथक परिश्रमामुळे हा मृतदेह सापडला असून मृतदेहाची ओळख पटली असून पुढील तपास सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस करीत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## मैथिली गेली..सरकार झोपलं!"
## विमान अपघाताला महिना उलटला
### एक रुपयाची मदत नाही!
### शासनाच्या घोषणा हवेत विरल्या!

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**



उरण तालुक्यातील तरुणी मैथिली पाटील हिचा एका विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्या काळजाला चिरणाऱ्या घटनेला आज अक्षरशः महिना उलटून गेला आहे. अपघाताच्या दुसऱ्याच दिवशी मोठ्या थाटात विविध मंत्र्यांकडून व प्रशासनाकडून भरघोस मदतीच्या घोषणा करण्यात आल्या. "ही आमची मुलगी आहे", "सरकार कुटुंबाच्या पाठीशी आहे" असे भावनिक उद्गार प्रसारमाध्यमात झळकले. मात्र आज एक महिना उलटूनही त्या मदतीचा एक रुपयाही पोहोचलेला नाही.

मैथिलीच्या वृद्ध वडिलांना नाईलाजाने मजुरी करावी लागत आहे, तर आई व आजी यांचे डोळे सरकारकडे आशेने लागले आहेत.

प्रशासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे सांत्वनाचे फोटो आणि टीव्हीवरील वल्गना यापलिकडे काहीच राहिलेले नाही. प्रत्यक्षात मदतीच्या घोषणा म्हणजे एक ढोंगी स्वप्न ठरलं आहे, आणि लोकशाहीची संवेदनशीलता पुरती गढूळ झाली आहे.

## "महाराष्ट्र बँक ऑथोराइज धोरणात स्थानिकांना डावलले – ॲप-बेस्ड टॅक्सी संघटनेची मुख्यमंत्री यांच्याकडे तातडीने भेटीची मागणी"

**दैनिक युवक आधार**
**- मुंबई प्रतिनिधी योगिता सावंत**

महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेच्या ॲप-बेस्ड टॅक्सी संघटनेने महाराष्ट्र सरकारच्या "बँक ऑथोराइज धोरण २०२५" वर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संघटनेचा आरोप आहे की या धोरणात स्थानिक ॲप-बेस्ड टॅक्सी चालकांच्या हितांचा विचार करण्यात आलेला नाही, त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर संघटनेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तातडीने भेटीची मागणी केली असून, धोरणातील त्रुटींविषयी विस्तृत निवेदन सादर करण्यात आले आहे.

संघटनेच्या मुख्य मागण्या:
सर्ज भाडे दरात पारदर्शकता
ॲप-बेस्ड टॅक्सींसाठी स्वतंत्र दर प्रणाली लागू करणे
इंधन क्षमतेनुसार दर निश्चित करणे
महिला चालकांसाठी विशेष योजना
गैर-TR क्रमांकाच्या वाहनांचा गैरवापर रोखणे
ड्रायव्हर स्पॉट फाईनचा अन्याय थांबवणे
ऑनलाईन एलटीएस प्रणालीवर प्रशिक्षित चालकांची नोंदणी

संघटनेचे सचिव आरिफ शेख, उपाध्यक्ष सुधीर बोरसे आणि पोपटराव जानकर यांनी स्पष्ट केले की, धोरण राबवण्यापूर्वी स्थानिक प्रतिनिधींशी सल्लामसलत झाली पाहिजे. अन्यथा, अनेक चालक बेरोजगार होण्याची शक्यता आहे.

संघटनेच्या वतीने विविध विभागांतील वाहनचालक, मुस्लिम आणि इतर समाजघटकांच्या प्रतिनिधींसह, महिलांनीही या आंदोलनात सहभाग घेतला. 'दैनिक युवक आधार न्यूज २४' ने घेतलेल्या मुलाखतीत अनेकांनी आपली व्यथा आणि मागण्या मांडल्या.






# "साहित्यरत्न डॉ. गणेश राऊत यांचा वाढदिवस केक न कापता दिव्यांग मुलांसमवेत प्रेरणादायी उपक्रमांनी साजरा"

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

*प्रेरणेचा दीप – जमील सर।*लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन कोंढवे धावडे येथील श्रावस्ती दिव्यांग मुला मुलींची शाळा या ठिकाणी विविध उपक्रम आयोजित करत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीस श्री महंत श्रीकांत दादा धुमाळ (महाकाल भक्त उज्जैन) वं जिल्हा परिषद सदस्य सौं. अनिताताई तुकाराम इंगळे यांच्या उपस्थितीत विनम्र अभिवादन करून अभिष्टचिंतन सोहळा साजरा न करता केक न कापता एक प्रेरणादायी वाढदिवस अखिल भारतीय छावा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते साहित्यरत्न डॉ. गणेश विठ्ठल राऊत यांनी वेगवेगळे उपक्रम करत एक प्रेरणादायी स्मृतिदिन केला. या उपक्रमामध्ये श्रावस्ती दिव्यांग मुला मुलींची शाळा या ठिकाणी केक न कापता मुलांना मेडिकल किट, खाऊ, विल चेअर नवरत्न ओल्डज होम अन्नधान्य किट देत, अजिंक्य महाराष्ट्र न्यूज प्रतिनिधींची नियुक्ती करत, कॉम्प्युटर क्लासेस, संभाषण कौशल्य बालसंस्कार वर्ग, वं एस एस सी आय कोचिंग क्लासेस या सर्व उपक्रमांना चालना देत विविध उपक्रमाने कर्तव्यपूर्ती केली.हे सर्व उपक्रम दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते श्री महंत डॉ. श्रीकांत दादा धुमाळ (महाकाल भक्त उज्जैन), जिल्हा परिषद सदस्य सौ. अनिताताई तुकाराम इंगळे छावा संघटनेचें पुणे जिल्हा अध्यक्ष अक्षय भाऊ बोडके, युवा ग्रामीण महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गणेश महाडिक व अजिंक्य महाराष्ट्र न्यूज चॅनेलचे संपादक संतोष लांडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.. या कार्यक्रमाला छावा संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र संघटक आशिष भाऊ खंडेलवाल, श्री विष्णू पवार पुणे जिल्हा



उपाध्यक्ष,श्री. अण्णा खोबरे मुळशी तालुका अध्यक्ष, श्री मयूर धावडे हवेली तालुकाध्यक्ष, सरफराज शेख अल्पसंख्यांक अध्यक्ष, गणेश वाघमारे व्यापारी आघाडी अध्यक्ष, गोकुळ हसे पिंपरी चिंचवड कामगार आघाडी अध्यक्ष, भाजप नेते उमेश भाऊ सर पाटील, राष्ट्रवादी युवा ग्रामीण हवेली अध्यक्ष त्रिंबकांना मोकाशी, सां. का. सूर्यकांतजीं सकपाळ,शिवसैनिक अविनाश सरोदे, लोकसेवक अतुल दांगट प्रशांत लांडगे,बांधकाम व्यवसाय शिवाजी तात्या धावडे, प्रकाश गायकवाड, संघर्ष चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक चंद्रकांत मोरे, सुमित मोहिरे, नवनाथ भाऊ धावडे विश्वकर्मीय गजानन काका वानखेडे, माऊली रायरीकर, पत्रकार बंधू कांता भाऊ राठोड, गोपाळ भालेराव, धनंजय घरत अनंत वांजळे विकी सोनपेठकर, प्रितेश पाटील आप्पा पांचाळ, श्रीरंग गायकवाड प्रीती यादव सौ अनिताताई राकडे श्रद्धा ताई मोहिरे धनंजय यादव व इतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते..

आपल्या अभिष्टचिंतन सोहळ्या दिनी आपला वाढदिवस साजरा न करता अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन साजरा करणारे हे पहिले व्यक्तिमत्व आहे तसेच वाढदिवसानिमित्त केक न कापता दिव्यांग मुलांना केक भरून अन्नधान्य वाटप करून औषधोपचार किट वाटप करून व्हीलचेअर वाटप करत वृद्ध मातापित्यांना अन्नदान करत अनेकांसाठी प्रेरणा बनणार व्यक्तिमत्व म्हणजे साहित्यरत्न डॉ. गणेश राऊत हे आम्ही सर्वांनी पाहिले हीच प्रेरणा सर्वांनी घ्यावी आणि आपला वाढदिवस आणाठाई खर्च न करता अशाच ठिकाणी साजरा केला जावा असे परखड मत श्रीमहंत डॉ. श्रीकांत दादा धुमाळ व सौ. अनिताताई इंगळे यांनी व्यक्त केले..

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघर्ष चारिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष प्रशांत महाजन यांनी केले..

एक अनोखा आगळावेगळा उपक्रम दिव्यांग मुलांच्या शाळेमध्ये साजरा केला गेला त्यासाठी संस्थेच्या वतीने संस्थापिका कांचनाताई कदम यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

## देगलूर येथे खा. डॉ.अजित गोपछडे यांच्या उपस्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा स्थापनेसाठी निवेदन सादर

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** - देगलूर राज्यसभेचे लोकप्रिय खासदार सन्माननीय डॉ. अजित गोपछडे साहेब देगलूर रेस्ट हाऊस येथे आगमन झाल्यानंतर, धनगर समाजाच्या वतीने तातडीने निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनामध्ये समाजाच्या आण-बाण-शान असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा भव्य पुतळा देगलूर येथे उभारण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. विशेष म्हणजे निवेदन सादर होताच, खा.डॉ. अजित गोपछडे साहेबांनी एक क्षणही न घालवता संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ फोन करून सदर प्रस्ताव त्वरित माझ्या कार्यालयाकडे पाठवा असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच त्यांनी अधिकाऱ्यांशी बोलताना



सांगितले की पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रीशताब्दी वर्ष संपूर्ण देशभर साजरे केले जात आहे, त्यामुळे हा पुतळा उभारणे ही काळाची गरज आहे या वेळी मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, व धनगर समाज बांधव उपस्थित होते. उपस्थितांनी साहेबांच्या सकारात्मक आणि तत्पर प्रतिसादाचे कौतुक केले. या निर्णयामुळे धनगर समाजामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची स्मृती जपण्याच्या दृष्टीने ही एक ऐतिहासिक घडामोड ठरणार आहे.

## सीकेटी महाविद्यालयात "भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण" कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे अर्थशास्त्र विभागा तर्फे आज (दि. १९) "भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख आणि मानवता विद्याशाखा प्रमुख प्रो.डॉ. बी .एस. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. अरविंद मोरे (वरिष्ठ अधिकारी) बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल, यांनी अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना "भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण" या विषयावर मार्गदर्शन केले. "भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण" या कार्यक्रमध्ये भारतातील बँकांचे राष्ट्रीयीकरण हे का? केव्हा? आणि कोणत्या कारणामुळे झाले. तसेच सध्या व्यावसायिक बँकांसमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाय या वेगवेगळ्या मुद्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागाच्या एकूण ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. "भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण" या आयोजित कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.पाटील,आय.



क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.बी.डी.आघाव, यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. के. एन ढवळे यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एच. एस खरात, आणि कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रो.(डॉ) बी .एस. पाटील यांनी केले, तसेच या कार्यक्रमासाठी डॉ. के. बी. ढोरे, प्रा .डॉ. नीलिमा अरविंद मोरे (शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल) यांनी विशेष सहभाग घेतला.

## आय. आय. टी. कडून श्रुती संदीप घोडकेला संशोधनातील
### "मास्टर ऑफ सायन्स पदवी प्रदान"

**दैनिक युंवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेतील संशोधक प्रा. डॉ संदीप विलासराव घोडके व पर्यवेक्षिका संजीवनी संदीप घोडके यांची कन्या श्रुती घोडके हिला भारत सरकारच्या "भारतीय प्रौद्योगिकी संस्थान" ( IIT ) द्वारे "मास्टर ऑफ सायन्स ही पदवी दिमाखदार सोहळ्यात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली. संपूर्ण भारतातील सलग आठ वेळा स्वच्छ व सुंदर शहर म्हणून नावलौकिक असलेल्या इंदोर येथील आयटीच्या कॅम्पस मध्ये आयआयटीचे प्रमुख निर्देशक प्रा. डॉ सुहास जोशी यांच्या हस्ते तसेच पद्म भूषण डॉ चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि अनेक संशोधक यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या समारंभात श्रुती घोडके हिला सदरची पदवी बहाल करण्यात आली.




लहानपणापासूनच गणित , संस्कृत व विज्ञानाची विशेष रूची असलेल्या श्रुतीने आय.पी.एम, स्कॉलरशिप ,दहावी व बारावी बोर्ड परीक्षा तसेच मुंबई विद्यापीठाची इंजीनियरिंग याबरोबरच गेट परीक्षा मध्ये उच्च श्रेणीचे गुण प्राप्त केलेले आहेत. आत्तापर्यंत विविध शैक्षणिक संस्था, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व रयत बँक यांच्यावतीने श्रुतीचे विशेष कौतुक करण्यात आलेले आहे. विशेष बाब म्हणजे मास्टर ऑफ सायन्स ही पदवी प्राप्त होण्यापूर्वीच श्रुतीच्या संशोधन व शैक्षणिक प्रगतीच्या आधारे अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीत सीनियर इंजिनियर म्हणून दिल्लीमध्ये चांगल्या पॅकेज सह नियुक्ती झाली आहे. तिच्या या दैदिप्यमान चढत्या आलेखाचा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल मधील जेष्ठ सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, रायगड विभागीय चेअरमन श्री .बाळाराम पाटील, जनरल बॉडी सदस्य भावनाताई घाणेकर व सुधीर शेठ , प्राचार्य, शिक्षणप्रेमी व रयत परिवाराने तिचे अभिनंदन केले आहे.

# सागरी शिखर परिषद 2025 ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## वाढवण बंदरामुळे भारत होणार सागरी महासत्ता – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवकआधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

वाढवण बंदराच्या उभारणीमुळे महाराष्ट्र आणि भारत सागरी महासत्ता होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असून, हा प्रकल्प केवळ बंदर नव्हे तर एक आर्थिक क्रांती घडवून आणणारा केंद्रबिंदू ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.ते राज्य शासनाच्या मत्स्य व्यवसाय व बंदरे विभाग आणि महाराष्ट्र सागरी मंडळाच्या वतीने आयोजित सागरी शिखर परिषद-2025 च्या उद्घाटन प्रसंगी बोलताना म्हणाले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांच्या हस्ते सागरी शिखर परिषदचे उद्घाटन करण्यात आले. मुंबईमध्ये झालेल्या या कार्यक्रमास मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे, परिवहन व बंदरे विकास विभागाचे अपर मुख्य सचिव संजय शेठी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उद्योग विभागाचे सचिव पी अंबलगन, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीचे अध्यक्ष उमेश वाघ आदी उपस्थित होते. यावेळी केंद्र शासनाच्या मेरीटाइम व्हिजनचा उल्लेख करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस




म्हणाले की, भविष्यात भारत हा जागतिक सप्लाय चेनमधला एक मोठा खेळाडू बनू शकतो. म्हणूनच केंद्र सरकारने 'इंडिया मेरीटाईम व्हिजन 2030' आणि 'अमृतकाल मेरीटाईम व्हिजन 2047 तयार केले आहेत. या दोन्ही व्हिजनचा अभ्यास करून, महाराष्ट्रासाठी एक मजबूत मेरीटाईम व्हिजन तयार करण्याचे आपले उद्दिष्ट आहे. या धोरणासाठी आजच्या चर्चासत्रातील सर्व शिफारशी संकलित करून आम्ही त्या अमलात आणू.मुंबई ही आपली आर्थिक, व्यावसायिक, मनोरंजन आणि आर्थिक राजधानी आहे. मुंबईला भारताचं आर्थिक इंजिन बनवणारं कारण म्हणजे मुंबई पोर्ट आणि जेएनपीटी पोर्ट ही बंदरे आहेत. ही दोन बंदरे मुंबईला आघाडीवर घेऊन आली. आता आपण जागतिक सप्लाय चेनमध्ये शक्ती बनण्याचा संकल्प करत आहोत, त्यामुळे बंदरांची क्षमता, कार्यक्षमता आणि कनेक्टिव्हिटी वाढवावी लागेल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे वाढवण बंदर होणार नव्हते. पण केंद्रात नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात आमचे सरकार आल्यावर पुन्हा नव्याने प्रयत्न हाती घेण्यात आले. प्रारंभी प्रकल्प 100% महा पोर्टकडे होता, परंतु त्याचा व्याप पाहता केंद्र सरकारला प्रमुख भागीदार करण्यात आले. वाढवण बंदर पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवेल. भारत सध्या जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे आणि महाराष्ट्र हे नेतृत्व करण्यास तयार आहे," असेही त्यांनी यावेळी सांगून ते म्हणाले आम्ही वाढवण बंदराला जोडणारे रेल्वे जाळे तयार करण्याचाही प्रयत्न करत आहोत. सागरमाला प्रकल्पामुळे ही कनेक्टिव्हिटी खूपच सोपी झाली आहे. वाढवण पोर्टवर मल्टी-मोडल कार्गो हाताळणी क्षमता निर्माण होईल. आम्ही आमची नॉन-मेजर पोर्ट्सही अधिक कार्यक्षम बनवण्याचा प्रयत्न करत आहोत कारण त्यांचंही महत्त्वाचं योगदान आहे. भविष्यात आपण केवळ कार्गो हाताळणीपुरते मर्यादित राहणार नाही, तर शिपबिल्डिंग, शिप रीसायकलिंग, वॉटर ट्रान्सपोर्टच्या दिशेने जाऊ शकतो. महाराष्ट्रात विशेषतः मुंबई-नवी मुंबई भागात जलवाहतुकीची खूप मोठी संधी आहे. यामुळे नागरिकांचा जीवनमान खूप सुकर होऊ शकतो, असे श्री. फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री फडणवीसपुढे म्हणाले की, भारताचे पहिले 'ऑफशोअर विमानतळ' वाढवण बंदराशेजारी उभारले जात आहे. यामुळे जलमार्ग, रेल्वे, रस्ता आणि हवाई मार्गांची मल्टिमोडल जोडणी मिळेल. यासाठी सागरमाला प्रकल्पांतर्गत केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. महाराष्ट्रात जलवाहतूक, शिपबिल्डिंग आणि शिप रीसायकलिंगसाठी मोठी संधी आहे," असे मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले. समृद्धी महामार्गामुळे सुमारे 15-16 जिल्ह्यांना जेएनपीटी बंदराशी जलद जोडणी मिळाली असून, जिथे माल पोहोचण्यासाठी 6-7 दिवस लागत होते, तिथे आता तो प्रवास 10 तासांपेक्षा कमी वेळेत होतो. वाढवण बंदरालाही 'ऍक्सेस कंट्रोल्ड' रस्त्यांद्वारे समृद्धी महामार्गाशी जोडण्यात येत आहे, ज्यामुळे 24 जिल्ह्यांना थेट बंदर कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. कोकणातील पारंपरिक बंदरांचा इतिहास सांगून मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, कोकणातील काही बंदरे 500ते600 वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी प्रसिद्ध होती. त्या गौरवशाली इतिहासाला पुन्हा उजाळा देत आहोत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि ती बंदरांमुळे आर्थिक इंजिन झाली आहे.

यावेळी सागरी शिखर परिषद-2025 च्या उद्घाटन प्रसंगी अर्जुन उपस्थित असणारे मंत्री नितेश राणे म्हणाले की, मेरिटाईम समिट हे शिखर संमेलन केवळ एक कार्यक्रम नाही, तर महाराष्ट्राला भारताच्या मेरीटाईम क्षेत्रात आघाडीच्या स्थानी नेण्यासाठी घेतलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली, जागतिक मेरीटाईम हब होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. राज्यातही मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिशील नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या समुद्रकिनारपट्टी आणि मेरीटाईम क्षमतेचा जास्तीत जास्त उपयोग करण्याची दिशा मिळाली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सागरी किनारपट्टीचा वापर करत बंदराधिष्ठित विकास, सागरी उत्पादन आणि किनारपट्टी वाहतुकीस चालना दिली आहे. महाराष्ट्र हे भारताच्या आर्थिक प्रगतीचे इंजिन आहे. अरबी समुद्र ही केवळ आपली भौगोलिक सीमा नाही, तर ती एक संधीने भरलेली दुवा आहे, असे श्री. राणे यांनी सांगितले. आज महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प म्हणजे वाढवण बंदर. हे एकदा कार्यान्वित झाल्यावर, जगातील टॉप 10 खोल समुद्र बंदरांपैकी एक ठरेल. येथे उच्च दर्जाचे कंटेनर हाताळणी, खोल पाण्याची उपलब्धता आणि जागतिक दर्जाची लॉजिस्टिक्स सुविधा असेल. हे बंदर महाराष्ट्रासाठीच नाही, तर भारताच्या जागतिक व्यापारातल्या भूमिकेसाठीही गेमचेंजर ठरेल, असा विश्वास श्री. राणे यांनी यावेळी व्यक्त केला. नेदरलँड्स दौऱ्यामुळे आंतरराष्ट्रीय संधी खुले झाल्या आहेत. या दौऱ्यात अनेक संस्था बरोबर सामंजस करार करण्यात आले आहेत. यातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येणार आहे. तसेच राज्यातील सहा आयटीआय चे आधुनिककरण होणार असून त्याद्वारे दरवर्षी 7000 युवकांना आधुनिक सागरी कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र सरकारने 'शिपबिल्डिंग, शिप रिपेअर व शिप रीसायकलिंग पॉलिसी 2025' जाहीर केली. या धोरणांतर्गत प्रकल्पांना भांडवली अनुदान, कौशल्यविकासासाठी वित्तीय प्रोत्साहन, जलद परवानगी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही श्री राणे यांनी सांगितले. महाराष्ट्र भारताच्या मेरीटाईम परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी आपण तयार असून आपल्याकडे धोरण, जमीन, पायाभूत सुविधा आणि नेतृत्व आहे. आता भागीदार हवे असून यासाठी हे समिट महत्वाची असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले तर श्री. शेठी यांनी प्रस्ताविकात राज्यातील बंदर विकासात करण्यात येत असलेल्या पायाभूत सुविधा, कनेटीव्हीटी याबद्दल माहिती दिली.

# अठरा विश्वदारिद्र्य घेऊन जगणाऱ्या मागाबाई वानखेडे यांना निवाऱ्याकरिता सरसावला मदतीचा हात
# मागाबाईंच्या जीर्ण घराला निलेशदादांच्या मदतीचा आधार !

**दैनिक युवक आधार**
**- घाटंजी तालुका प्रतिनिधि महेश पेन्दोर**

घाटंजी: अठराविश्व दारिद्र्यात आयुष्य कंठणाऱ्या मागाबाई वानखेडे आणि त्यांचे पती प्रल्हाद यांच्या जीर्ण झालेल्या घराला अखेर मदतीचा हात मिळाला आहे. 'जिव्हाळ्याची भिंत' संस्थेच्या माध्यमातून या कुटुंबाला यापूर्वीही अन्नदान आणि इतर अत्यावश्यक सेवा पुरवण्यात आल्या होत्या. आता घाटंजी येथील उद्योजक निलेशदादा निलावार यांच्या सहकार्याने मागाबाईंच्या घराला नवीन छप्पर मिळाले आहे.




वानखेडे कुटुंब एका पडक्या झोपडीत राहत होते, जिथे छप्पर फाटल्यामुळे पावसाळ्यात घरात पाणी येत असे. पावसामुळे त्यांची संपूर्ण झोपडी ओलीचिंब होऊन जायची, ज्यामुळे त्यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत होता.

गेल्या अनेक वर्षांपासून निलेशदादा निलावार यांचे कुटुंब 'जिव्हाळ्याची भिंत' संस्थेच्या अन्नदान सेवेसाठी दरवर्षी २०,००० रुपयांची आर्थिक मदत करत आले आहे. यंदा त्यांच्या मुलीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, निलेशदादांनी मागाबाईंच्या घराच्या दुरुस्तीची आपली इच्छा व्यक्त केली. ही इच्छा पूर्ण करत त्यांनी ४ टिनपत्रे, २ फाटे, ६ डेळी आणि एक मोठी ताडपत्री देऊन मागाबाईंच्या घराला आता गळणारे नाही असे मजबूत छप्पर दिले आहे.

या मदतीमुळे कृतज्ञ झालेल्या मागाबाईंच्या डोळ्यातून आनंदाश्रू तरळले. त्यांनी निलेशदादांना आशीर्वाद देत म्हटले, "तुया वेळ मांडवापर्यंत जावो...म्हातारं म्हातारा हो माय वय तुले लागो....." मागाबाईंच्या या शब्दांतून त्यांच्या मनातील नितांत समाधान आणि निलेशदादांविषयीची आदर भावना स्पष्ट दिसून येते. निलेशदादांच्या या कृतीने वानखेडे कुटुंबाला एक सुरक्षित आणि कोरडे निवारा मिळाला असून, त्यांच्या आयुष्यात आशेचा नवा किरण उमळला आहे.

# आपटी ते शेळी रस्त्याचा मुहूर्त कधी निघणार
## आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्यावर ग्रामस्थांचा विश्वास

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :- जितेंद्र खोडे**

**राळेगाव :-** तालुक्यातील आपटी (रामपूर ) ते शेळी महाड जोडणारा रस्त्याचा कधी मुहूर्त निघणार असा प्रश्न आपटी आणि शेळी महाड या गावकऱ्यांमध्ये पडला आहे,जेव्हा पासून रस्ता झाला पण अनेक वर्षांपासून रस्त्याची दुरुस्ती झालीच नाही रस्त्याला कमीत कमी २० ते २५ वर्ष झाले असून प्रशासन या बाबींकडे काना डोळा करत आहे आपटी व शेळी महाड जोडनारा रस्त्याला खड्ड्याचे साम्राज्य आहे पाय कुठे टाकायचा समजेना अशी अवस्था रस्त्याची झाली आहे यामुळे ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत आहे शेतकऱ्यांना बैल बंडी कशी न्यायची असा प्रश्न पडतो. शेतकऱ्यांसाठी मुख्य रस्ता तोच असल्या कारणाने त्याच रस्त्याने प्रवास करावा लागत आहे, त्याच रस्त्याने एका नाल्याला पुलाची पण गरज आहे,त्या नाल्याजवळ छोटा मोटा अपघात होऊ शकतो,माझा शेतकरी राजा सहन शीलत्तेचा राजा आहे हे सर्व एवढे दिवसापासून सहन करत आहे पण प्रशासनाला जाग आली नाही. मात्र प्रशासन झोपेचं सोंग घेऊन आहे आता आपटी आणि शेळी महाड रस्ता होण्यासाठी आपटी आणि शेळी (महाड) ग्रामस्थांनी संपूर्ण विश्वास अशोक उईके मंत्री यांच्यावर दाखवला आहे की आमची अपेक्षा तेच पूर्ण करतील अशा ग्रामस्थांमध्ये चर्चा आहे.



# बोगस बियानांचा काळा बाजार,,शेतकऱ्यांसाठी एक शाप.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.**


**काळ्या काळ्या शेतामधी,**
घाम जिरव जीरव,तेव्हा पिकलं रे सोनं, काया मधून हिरवं"हे गीत ऐकून आम्ही लहानाचे मोठे झालो,,अगदी याच गीता प्रमाणे आमचा शेतकरीराजा चैत्र व वैशाख महिन्याच्या रखरखत्या उन्हात,,, शेतात राब राब राबून,,, काळ्या आईची सेवा करतो,,,शेती पेरणीयोग्य करतो. मृग नक्षत्राच्या पहिल्या सरी पडल्या रे पडल्या की शेतकऱ्यांचा आनंद गगन मावत नाही,,,तो आनंदाने,उत्साहाने नाचत गात शेतात पेरणी करतो. शेतकरी शेतात नुसतं बियाणं पेरत नाही तर त्याच्या भविष्याची अनेक स्वप्न पेरत असतो,,कुणी मुलांच्या शिक्षणाची,, उत्तम भविष्याची पेरणी करतो,,,तर कुणी मुलीच्या लग्नाच्या नियोजनाची पेरणी करतो,,,कुणी आई वडिलांच्या निरोगी आयुष्यातसाठी मोठया तडजोडीची पेरणी करतो,,तर कुणी अनेक रंगी बेरंगी मोठं आशा अपेक्षांची पेरणी करतो,,,अन कुणी कर्जाच्या ओझ्यातून मुक्त होण्यासाठी पेरणी करतो.शेतात पेरणी केल्यानंतर शेतकरी,,दररोज आपल्या पेरलेल्या शेतकडे जाऊन बघतो,,, एक दिवस जातो दोन दिवस जातो,, असं करता करता पाच- सहा, दहा- पंधरा दिवस होऊन जातात,, शेतकरी शेतात जाऊन बघतो पण,,त्याला शेतात कुठेही पीक वर आलेलं दिसत नाही,,बियाणं निघालेलं दिसत नाही. वर्षभर पोटाला चिमटा देऊन,,एक एक पैसा जोडून महागा मोलाचं बियाणं आणलं जातं अन असं ते जेव्हा शेतात निघत नाही तेव्हा हा शेतकरी मनातल्या मनात ओक्सबोक्सी रडतो,, हतबल होतो. शेतकऱ्यांच्या शेतात जे बियाणं निघालं नाही त्याला जबाबदार कोण? याची जबाबदारी कोण घेणार,,बियाणं विकणारे कृषी केंद्र की, गावापातळवीर ज्याची जबाबदारी असते तो कृषी सेवक, कि जिल्हा कृषी विभाग?? बियाणं उत्पादित करणारी कंपनी,की कंपनीला परवानगी देणारं प्रशासन?पण यातील कोणावरही कधीही कोणती कारवाई होताना मी तर बघतली नाही किंवा अद्याप पावतो झाली नाही.याच कारण हे सगळे आतून एकमेकांना मिळालेले असतात ते आतून एकच असतात सर्व मिलबाटके एकमेकांना पाकिटे पोहचतं करतात अन त्या बिचाऱ्या शेतकऱ्याला मुर्खात काढतात. शेतकऱ्यांला सांगतात की तुमच्या जमिनीत दोष आहे,तुम्ही पेरणी बरोबर केली नाही. तो बिचारा शेतकरी या गेंड्याची कातडी असणाऱ्या शासन प्रशासना विरोधात लढणार तरी किती,,तो लढणार फक्त आपल्या नशिबाशी,, परत घरी येऊन दुबार पेरणी करणार अन पुन्हा बियाणं निघतं की नाही याची वाट बघणार.अश्या घटना एका वाशिम जिल्ह्यात घडत नाही तर सम्पूर्ण राज्यात अनेक शेतकरी अश्या संकटाला समोरे जात आहे.मात्र याकडे शासन प्रशासन किंवा स्थानिक लोकप्रतिनिधी यापैकी कोणाचेही लक्ष्य नाही.शेतकऱ्याचं हे दुःख वेदना कोणीही जाणू शकत नाही कारण शेतकरी हा शासन व प्रशासन यांच्याकडून टाकून,फेकून दिलेला विषय आहे,,त्याला कोणीही वाली नाही,,,शासन व प्रशासन शेतकऱ्यांसाठी मोठं मोठ्या योजना आणते खरी पण त्या निरपयोगी,, त्याचा शेतकऱ्याला प्रत्येक्ष्यात किती उपयोग होतो हे अपल्याला सर्वश्रुत आहे. शासनाच्या योजना म्हणजे "बड्या बड्या बाता अन ढुंगण खाई लाता" अश्या आहेत.



**नॅशनॅलिस्ट कंजूमर प्रोडक्शन ऑर्गनायझेशन जिल्हा अध्यक्ष प्रताप नागरे वाशिम.**

# वाहनांचे नियमबाह्य चमकदार चिनी बनावटीचे दिवे ठरताहेत जीवघेणे
## तीव्र प्रकाशामुळे अपघातात वाढ कारवाईची जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



**विंचूर** :- निफाड तालुक्यात नव्हे जिल्ह्यात वाहनधारकांमध्ये एलईडी हेडलाईट्स वापरण्याचा ट्रेंड वाढला असून, अनेकजण नियम डावलून अधिक तीव्र प्रकाशाचे दिवे बसवत आहेत. परिणामी, रात्रीच्या वेळेस अशा लाईट्समुळे समोरून येणाऱ्या वाहनचालकांचे डोळे दिपून अपघात होण्याच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे अशा बेकायदेशीर एलईडी लावणाऱ्या वाहनांवर तातडीने कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तालुक्यात दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वाहनांमध्ये काहीतरी 'युनिक' असावे या उद्देशाने अनेकजण गाडीच्या हेडलाईटमध्ये अधिक तेजस्वी एलईडी लावतात. विशेषतः कार, जीप आणि दुचाकी वाहनांमध्ये हेडलाईटच्या शेजारी उच्च क्षमतेचे एलईडी दिवे बसवले जातात. हे दिवे इतक्या तीव्र प्रकाशाचे असतात की, समोरून येणाऱ्या चालकाचे डोळे काही क्षणांसाठी दिपून जातात. परिणामी, तो डोळे मिटतो किंवा थांबतो, आणि अपघाताचा धोका निर्माण होतो. वाहन उत्पादक कंपन्या हेडलाईट्स ठराविक निकषांनुसार तयार करतात. त्या हेडलाईट्सना संबंधित विभागाकडून परवानगी मिळालेली असते. परंतु बाजारात सहजपणे मिळणाऱ्या डेकोरेटिव्ह एलईडी दिव्यांचा वापर करून वाहनचालक वाहनात बेकायदेशीर फेरबदल करत आहेत. वाहन डिझाइनमध्ये अशाप्रकारचे बदल करणे हे वाहतूक नियमांचे उल्लंघन आहे, तरीदेखील यावर प्रशासनाचे लक्ष नसल्याने नागरिकांत संभ्रम निर्माण झाला आहे. रात्री प्रवास करताना अशा तीव्र प्रकाशामुळे पादचारी, दुचाकीचालक आणि वृद्ध यांना मोठा त्रास होतो. काही वेळा डोळे मिटल्याने चुकून एखाद्या अडथळ्याला धडकण्याची शक्यता निर्माण होते. यामुळे एलईडी लाईट वापराचे प्रमाण नियंत्रणात आणावी, प्रशासनाने कार डेकोरेशन सेंटरवर लक्ष ठेवून बेकायदेशीर हेडलाईट्सची विक्री व बसविणे थांबवावे, वाहनांची तपासणी करून अशा वाहने थांबवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

परिवहन विभागाच्या मानकांनुसारच वाहन उत्पादक कंपन्या हेडलाईट्स तयार करतात. त्या विविध चाचण्या पार केल्यानंतरच वापरण्यास मंजूर होतात. परंतु बाजारात मिळणारे एलईडी दिवे कोणत्याही प्रमाणपत्राशिवाय विना चाचणी वापरले जात आहेत. हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

**भास्करराव शिंदे**
**स.पो.नि.भास्करराव शिंदे**

# कामोठे प्रभागात उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

सुंदर पनवेल, हरित पनवेल' या संकल्पनेखाली पनवेल महानगरपालिकेच्या उद्यानविभागार्फत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर वृक्षारोपण मोहिम राबविण्यात येत आहे.प्रभाग समिती क अंतर्गत सेक्टर ३१,जुना एसटीपी परिसर,कामोठे येथे उद्यान विभागामार्फत गुरूवारी वृक्षारोपण करण्यात आले. पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग आणि डॉ.अरुण भगत (माजी नगर सेवक), रॉबिनहूड आर्मीचे हंसराज वर्मा, निसर्गप्रेमी संस्थेचे सुनील करपे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जुलै २०२५ रोजी कामोठे येथील सेक्टर ३१,जुना एसटीपी परिसर,कामोठे येथे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे,अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत सेक्टर ३१ जुना एसटीपी परिसरात अर्जुन, बेहडा यासारखी औषधी वनस्पती व जांभूळ, आवळा ही फळझाडे व इतर विविध १५० वृक्षांचे लागवड करण्यात आले, सदर वृक्षारोपण कार्यक्रम डॉ.अरुण भगत (माजी नगर सेवक), रॉबिनहूड आर्मीचे हंसराज वर्मा, निसर्गप्रेमी सुनील करपे, सौ.शुभांगी सुरेश खरात व इतर स्थानिक नागरीकांच्या उपस्थितीत पार पडले.

सहा.आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक श्री. मांगीलाल जाधव , सहा.उद्यान पर्यवेक्षक श्री.कुणाल राठोड यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# सिल्लोड तालुक्यातील 36 गावांचा डोंगरी भागात समावेश
## आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक युवक आधार**
**सिल्लोड प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** - सोयगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांच्या विशेष प्रयत्नाने सिल्लोड तालुक्यातील तब्बल 36 गावांचा डोंगरी भागात समावेश करण्यात आला आहे. सदर निर्णय डोंगरी विकास विभाग कार्यक्रमांतर्गत सुधारित निकष व निकषांनुसार निश्चित केलेले डोंगरी क्षेत्र / अनुज्ञेय कामांबाबत शासनाने गुरुवार ( दि.17 ) रोजी शासन निर्णय जाहीर केला आहे. आमदार अब्दुल सत्तार यांनी याबाबत सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने डोंगरी भागात समावेश करण्यात आलेल्या गावांमध्ये विविध विकासासाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आमदार अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघात विकासाचा झंझावात उभा केला आहे. सिल्लोड - सोयगाव शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पायाभूत मूलभूत विकासाची कामे प्राधान्याने करण्यात येत आहे.



असे असताना डोंगरी भागात असूनही तालुक्यातील अनेक गावांना डोंगरी विकास योजनेचा निधी मिळत नव्हता. सदर गावांचा विकास व्हावा यासाठी यांचा डोंगरी भागात समावेश करण्यात यावा यासाठी आमदार अब्दुल सत्तार हे मागील अनेक दिवसापासून प्रयत्नशील होते. शासनाच्या डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत गुरुवारी ( दि.17 ) रोजी सुधारित निकष जाहीर करण्यात आले आहे. या सुधारित निकषच्या अनुषंगाने सिल्लोड तालुक्यातील 36 गावांचा समावेश करण्यात आला आहे. आता शासनाच्यावतीने या गावांच्या विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. सदर निधीच्या माध्यमातून परिसरात प्राथमिक शिक्षण, पाटबंधारेची कामे, रस्ते विकासाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे, समाज मंदिर, सामाजिक सभागृह, उपसा सिंचन योजना, एसटी निवारा, अंगणवाडी इमारत दुरुस्ती, अंगणवाडी इमारत, संरक्षण भिंत, नाविन्यपूर्ण वर्ग खोल्या बनविणे, शैक्षणिक साहित्य, सौरऊर्जेवरील दिवे, विद्युत विकास कामे मोठ्या प्रमाणात केली जाणार आहेत.

*** या गावांचा करण्यात आला समावेश :**

1 )विरगांव, २)जनासी, ३)गेवराई शेमी, ४)अंधारी, ५)चारनेरवाडी, ६) चारनेर, ७)शिरसाळा, ८) जळकी घाट, ९) धारला, १०)नाटवी, ११) घाटनांद्रा, १२) जांभई, १३)धावडा, १४)रांजणी, १५)मुकपाठ, १६) पिंपळदरी, १७)हळदा, १८)डकळा, १९) वाघेरा, २०) जळकी (वसई), २१)केळगांव, २२)आमसरी, २३) वसई, २४) घाटांब्री, २५)वडाळी, २६) अजिंठा, २७) कोऱ्हाळा, २८) अनाड, २९) सिरसाळा तांडा, ३०)नानेगाव, ३१) आधारवाडी, ३२)जंजाळा, ३३) धनशिंगवाडी, ३४)परदेशीवाडी, ३५) सिरसाम, ३६) घाटमखळ

# खळबळजनक.! ७० हजार रुपयात पंधरा दिवसाच्या बाळाची विक्री
## ७ आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल , साकोलीतील घानोड येथील संतप्त घटना

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा :** साकोली तालुक्यातील एका उपकेंद्रात एप्रिल २०२४ मधे जन्म झालेल्या एका बाळाला १५ दिवसाचा असतांना १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर दत्तक लिहुन देण्याची खळबळजनक बाब समोर आली आहे. चाईल्ड हेल्प लाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर ७० हजार रुपयात एका बाळाची विक्री झाल्याची तक्रार प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चाईल्ड हेल्प लाईन भंडाराचे कर्मचारी यांचे कडून प्राथमिक माहिती घेण्यात घेण्यात आली. त्यामध्ये बालकास दत्तक दिल्याचे माहिती झाले. सदर प्रकरणात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी नितीनकुमार साठवणे यांचे कडुन पुरावे गोळा करण्यात आले. त्यात साकोली तालुक्यातील उपकेंद्रात एप्रिल २०२४ मधे जन्म झालेल्या एका बाळाला १५ दिवसाचा असतांना १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर दत्तक लिहुन देण्यात आले. दत्तक घेतलेल्या पालकाकडुन अवैध पद्धतीचा अवलंब करून भंडारा शहरातील नामांकित खाजगी हास्पिटल मध्ये प्रसुती झाल्याचे दस्तावेज दाखवुन नगर परिषद भंडारामधुन नविन जन्म प्रमाणपत्र तयार केले. सदर प्रकरणात न्यायालयाचे कोणत्याही आदेश प्राप्त न करता आपसी पद्धतीने अवैध पद्धतीचा अवलंब करून बालकास दत्तक घेण्यात आले. या प्रकरणात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी नितीनकुमार साठवणे यांचेकडून पोलिस स्टेशन साकोली येथे राजपाल हरीचंद रंगारी वय ४७, सुचिता हरीचंद रंगारी वय ४४, रा. हसारा ता. तुमसर, अजित पतीराम टेभुर्णे वय ३५, सोनाली अजित टेंभुर्णे वय २५, नंदकिशोर मेश्राम वय ४५, राकेश पतीराम टेभुर्णे वय ३२, पुष्पलता दिलीप रामटेके वय ५० रा. घानोड ता. साकोली यांचे विरुद्ध जे.जे. अक्ट २०१५ च्या कलम ८० व ८१ अन्वये गुन्हा करण्यात आला आहे. सदर प्रकरणात सहाय्यक आयुक्त योगेश जवादे महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अरुण बांदुरकर तसेच बाल कल्याण समिती अध्यक्ष सानिका वडनेरकर , सदस्य मृणाल बांडेबुचे, महेश सातव, मेघा खोब्रागडे यांचे मार्गदर्शनात लोकप्रिया देशभ्रतार समन्वयक चाईल्ड हेल्प लाईन, विजय रामटेके, विक्की सेलोटे, सुनील राने यांनी हे प्रकरण उजेडात आणले.




# सावधान! मोबाईल वापरामुळे मुलांच्या आरोग्यावर होतात भयंकर परिणाम!

**दैनिक युवक आधार**
धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार

मोबाईलच्या अतिवापरामुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. यामध्ये डोळ्यांवर ताण येणे, डोकेदुखी, मानदुखी, निद्रानाश, मानसिक ताण आणि एकाग्रता कमी होणे यांसारख्या समस्यांचा समावेश आहे.

मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम:

**डोळ्यांवर परिणाम:**
मोबाईलच्या स्क्रीनकडे जास्त वेळ पाहिल्यास डोळ्यांवर ताण येतो. यामुळे डोळे कोरडे पडणे, डोकेदुखी आणि दृष्टी कमी होणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

**मानसिक आरोग्य:**
मोबाईलच्या अतिवापरामुळे चिंता, नैराश्य आणि झोपेच्या समस्या येऊ शकतात. तसेच, सोशल मीडिया आणि गेमिंग ॲप्सच्या अतिवापरामुळे स्क्रीन ॲडिक्शन होऊ शकते.

शारीरिक आरोग्य:
मोबाईलच्या अतिवापरामुळे पाठदुखी, मानदुखी आणि हातांमध्ये वेदना होऊ शकतात. तसेच, मोबाईलमधून उत्सर्जित होणाऱ्या किरणांमुळे आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

**एकाग्रता कमी होणे:**
मोबाईलच्या सततच्या वापरामुळे एकाग्रता कमी होऊ शकते. त्यामुळे, कामावर किंवा अभ्यासात लक्ष केंद्रित करणे कठीण होऊ शकते.



**सामाजिक परिणाम:**
मोबाईलच्या अतिवापरामुळे सामाजिक संबंधांवरही परिणाम होतो. लोक एकमेकांशी बोलण्याऐवजी मोबाईलमध्ये व्यस्त राहतात, ज्यामुळे संवाद कमी होतो.

**मुलांवर परिणाम:**
मुलांमध्ये मोबाईलच्या अतिवापरामुळे नैराश्याची भावना वाढू शकते. तसेच, ऑनलाइन असुरक्षिततेचा धोका वाढतो, ज्यामुळे सायबर गुंडगिरी आणि ऑनलाइन शिकारींची शक्यता वाढते.

**मोबाईलचा वापर कमी करण्यासाठी उपाय:**

**स्क्रीन टाइम मर्यादित ठेवा:**
दिवसातून किती वेळ मोबाईल वापरायचा आहे, हे निश्चित करा आणि त्याचे पालन करा.

**नियम पाळा:**
रात्री झोपण्यापूर्वी मोबाईल वापरणे टाळा आणि कामाच्या ठिकाणी मोबाईलचा वापर कमी करा.

**पर्यायी क्रियाकलाप:**
मोबाईल ऐवजी मित्र-मैत्रिणींशी बोला, खेळ खेळा किंवा चांगली पुस्तके वाचा.

**पालकांनी मार्गदर्शन करावे:**
मुला-मुलींना मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम समजावून सांगा आणि त्यांना इतर क्रियाकलापांमध्ये व्यस्त ठेवा.

आपल्या कुटुंबासाठी वेळ देऊन, समन्वय ठेवून , मोबाईलचा वापर कमी करून निरोगी आणि आनंदी जीवन जगू शकता.